धर्मपीठ फैजपूर येथील मंदिराचा संक्षिप्त इतिहास



इ.स. १९०० मध्ये बांधून तयार झालेले
श्री सतपंथी मंदीर, संस्थान फैजपूर

मुल्य : रू. १५/-

Real Patidar Library


About Real Patidar books

धर्मपीठ फैजपूर येथील मंदिराचा संक्षिप्त इतिहास



इ.स. १९०० मध्ये बांधून तयार झालेले
श्री सतपंथी मंदीर, संस्थान फैजपूर

मुल्य : रू. १५/-



इ.स. १६०० मार्गशिर्ष वद्य अष्टमीच्या दिवशी श्री सतपंथी संस्थान फैजपूरची प्रथम घटना तयार झाली त्यावेळेचे मंदीर (धर्मशाळा)



इ.स. १६०० मध्ये बांधलेले श्री सतपंथी मंदीर (धर्मशाळा)

निवेदन

सन्माननीय शंकर विठोबा पाटील मु ॥ दुधलगांव बु॥ यांनी अत्यंत परिश्रम घेऊन ''लेवा पाटीदार समाजाचा इतिहास'' लिहीला. त्यात त्यांनी लिहीले आहे की,'' मुळ उत्तर ध्रुवाकडील आर्यांची श्वेतवर्णी टोळी इराक, इराण, अफगाणिस्तान पंजाब मार्गे भारतात प्रवेश करून सिंधु व रावी काठी विसावली. तेथून ते लोक इतस्ततः चहुकडे पांगले. त्यातली एक टोळी काश्मिरकडे, दुसरी टोळी यमुना काठाने चंबळ ओलांडून मध्य प्रदेशाकडे शिरली. त्याचप्रमाणे एक पंजाबातून मध्यप्रदेश मार्गे गुजराथेत रेवा नदीकाठी स्थिरावली. तेथे शेती पशुपालन व सावकारी आदि व्यवसाय करू लागली आणि स्वतःस कुणबी समजून वावरू लागले''

''गुजराथेतून अहमदाबादकडे येतांना ह्यांना पाटीदार (पाटील) हे नाव मिळाले असावे. खेडा व भडोच जिल्ह्यात पाटीदार लोक जान्हवी घालतात. ७ ते ११ व्या वर्षी स्वजातीय गुरूंच्या हातून गळ्यात तुळशीची माळ घालीत. यांच्यात नात्र किंवा पाटाची म्हणजे पुनर्विवाहाची चालही दिसून येते. पुढे कालांतराने बीजमार्गी, दादुपंथी, कबीरपंथी, माधवगणी, प्रणामी, रामानंदी, स्वामीनारायण, वल्लभाचार्यी, जैन व मुसलमान अशा अनेक उपासनांच्या उपासक लोकांशी संपर्क आल्यामुळे यांच्या मूळ आचारा व विचारावर बरेच आघात होवून ते पूर्वीप्रमाणे राहिले नाहीत. लेवा कुणबी गुजराथेत आनंद, नडीयाद, बोरसद भागात वास्तव्य करून राहत आहेत.

'खान्देशस्थ लेवा-पाटीदारांची भाषा' या वाडमयीन प्रबंधाचे लेखक श्री देवराम सखाराम बऱ्हाटे यांच्या मते ''पंधराव्या शतकात 'पावागड' व 'जुनागड' हे दोन अजिंक्य किल्ले होते. ते गुजराथच्या मुसलमान महंमद याने स्व पराक्रमाने जिंकले व त्या प्रदेशाची लूट, कत्तल व जाळपोळ करून उध्वस्त केले. त्यावरून ह्या सुलतानास 'महंमद बेगडा' हे नाव मिळाले. हा 'पावाप्रलय' इ.सन १४८४ साली झाला. या अनर्थामुळे पावागडाच्या आसमंतातील लोक निर्वासित होऊन तापी तीराने वस्तीला गेले. त्यापैकी काही लेवा पाटीदार कुटूंबे खान्देशात तापी तीराने पाडळसे लगत स्थाईक झाली. त्या निर्वासीत लेवा पाटीदारांना खान्देशच्या फारूकी सुलतानाने आश्रय व वतने दिलीत.''

दि. ६ मे १९६१ रोजी मौजे दुधलगाव बु॥ येथे लेवा भाटाची मुलाखत घेतली तेव्हा त्यांनी सांगितले की ''गुजराथ प्रदेशात पावागड जिल्ह्यात बेझलपूर गावाचे शांडिल्य गोत्राचे वराडे आडनावाचे श्री भयाजी पाटील सन ४११ साली तेथे वैभवाने नांदत होते त्यांचे वंशज सन ७१२ चे सुमारास बेझलपूरची पाटीलकी करीत होते. ते ह्या प्रदेशातील लेवा समाजाचे प्रमुख मुखिया होते. पण कालान्तराने तेथील प्रजेवर मुसलमानी आक्रमण झाले. तेव्हा सन १२७५ नंतर पुढे काही वर्षांनी १४०० गाडीत लेवा समाजातील काही कुटूंबांनी कडवीर, अहमदाबाद भडोच, सुरत, नवापूर, नंदूरबार, सुलतानपूर, नांदेड मार्गे खान्देशात येवून बुऱ्हाणशहाचे अंमलाखाली वसाहत केली. तेथे पाटीलकी

देशमुखी व महाजनकी ही वतनेही मिळवलीत. ह्या लोकांचे प्रमुख उर्फ कुटूंबनायक वरील वेझलपूर निवासी वराडे आडनावाचे होते. त्यांना चारमुले होती. त्यापैकी एक साकेगाव व दुसरा एदलाबादला स्थाईक झाले. तिसरा विदर्भातील दाताळा व चवथा दुधलगाव बु ।। या गांवी वास्तव्य करून राहू लागले. त्यांचे वंशज अजूनही तेथे नांदतात. त्यांचेच नेतृत्वाखाली ७०० गाडी तापी नदी पलिकडे व ७०० गाडी तापीचे अलिकडे आणि सात आठ गाडी बऱ्हाणपूरमार्गे नेमाड जिल्ह्यात शिरली होती.

ह्या लोकांनी पूर्व खान्देशात तापी तिरी पाडळसे येथे व पूर्णेच्या खोऱ्यात तिच्या नळगंगा नावाच्या उपनदीच्या तिरावर दाताळा येथे दुसरा संघटन ठाया दृढ केला व नांदू लागले. हल्ली पूर्व खान्देशात १४० गावे, पश्चित वऱ्हाडात ८० गावे, मध्यप्रदेशात नेमाड जिल्ह्यात १० गावे असे जवळ जवळ सुमारे २३० गावातून अंदाजे पाच ते सात लाख लेवा पाटीदारांची वस्ती असावी''

अशा प्रकारचा लेवा पाटीदार लोकांचा इतिहास उपलब्ध आहे. या लेवा पाटीदार लोकांतून कित्येक कुटूंबे पावागडच्या इतिहासापासून महाराष्ट्रात पाडळसे उर्फ भोर गावी आल्याचा उल्लेख आढळतो. व त्यातीलच सत्पंथ धर्म स्विकारलेल्या काही कुटूंबांचा संबंध जुळतो. इ.स. १६०० च्या सुमारास फैजपूर येथील श्री सत्पंथी मंदीर बांधले गेले व तेथे धर्मपीठाची स्थापना झाली व तेव्हापासून अखिल महाराष्ट्रात सत्पंथ धर्मपीठ फैजपूरची स्थापना होऊन बाल ब्रह्मचारी आर्चकांची नेमणूक होत आहे.

सत्पंथ प्रवर्तक सद्गुरू श्री इमामशाह महाराज यांना आज जवळ जवळ ५०० ते ५५० वर्षे झाली. सद्गुरू इमामशाहांनी दिग्दर्शित केलेला सनातन सत्पंथ या धर्मपीठ फैजपूरचे अनुयायी पाळतात. सदगुरू इमामशाह महाराज हयात असतांना त्यांनी मध्यप्रदेश महाराष्ट्राच्या परिसरातून मराठवाड्याकडे आकोट, अकोला, सुरजी, अंजनगांव वगैरे विभागात जाऊन बरेच दिवस राहिल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्र्यात आढळतो. नंतर दक्षिण महाराष्ट्रात कोचरब भागात जाऊन त्यांनी निजाम राजाचा गर्व भंग केल्याचा उल्लेख आढळतो. नंतर लाछोरा, खान्देश, फैजपूर, सोनगढ वगैरे विभागातून धर्मप्रचार करीत ते गुजराथकडे रवाना झाल्याचा उल्लेख इमामशाहांच्या जीवन वृत्तांतात आढळतो. यावरून प्रत्यक्ष इमामशाह महाराजांनी मध्यप्रदेशातील काही भागांत व बऱ्हाणपूर खान्देशच्या विभागात तत्कालीन लोकांना धर्मोपदेश केला. त्या लोकांना सनातन सत्पंथाची शिकवण देऊन परंपरागत मार्गदर्शन करण्याकरीता ठिकठिकाणी मुखी नेमले. सद्गुरू इमामशाहांची शिकवण वैदिक धर्मातील सनातन सत्पंथाची आहे. ॐ चे स्मरण, ज्योतीस्वरूपाचे ध्यान, कलश घटपाट पूजेचे मंत्र, श्री निष्कलंकी नारायणाची उपासना व पितृशांतिकरीता उटासन बावन घाटी, जीवात्म्याचा परलोकातील प्रवास शेवटी सत्यलोकात प्रयाण अथवा सच्चिदानंद स्वरूपात लय आणि हे जो मानणार नाही त्याला लक्ष चौर्यायशीचे फेरे घ्यावे लागतील अशा प्रकारची सत्पंथाची शिकवण त्यांनी दिली.

पण इ.स. १६६१ च्या सुमारास बऱ्हाणपूर येथे एक

सैय्यद महंमदशाह धुले येऊन त्यांनी बरेच चमत्कार करून दाखविले. त्यांनी सय्यद वंशाचा गुरू असल्याचे व सत्पंथी लोक माझे शिष्य असल्याचे सांगितले. आपल्या अंगच्या हुशारीने व चमत्काराने त्यांनी लोकांना आकर्षित केले व बहाद्दरपूर येथे त्याची स्वतःची गादी स्थापन केली व मी सत्पंथीयांचा गुरू आहे असा रंग जमविला. त्यावेळेची भोळी भाबडी जनता त्यांच्या चमत्कारावर भुलली व मुखी लोकांच्या माध्यमातून त्यांना आमिश दाखवून, पगार देऊन सत्पंथीयांना त्यांच्या नादात लावले. त्या गादीवर स्थानापन्न होणारे लोक वंशपरंपरा पाळतात ते स्वतः कुराण पवित्र मानतात. रमजानचे उपवास करतात, मोहरम पाळतात, नमाज पढतात, कलमा पढतात गादीनशिन लोक संपूर्ण इस्लाम धर्म पाळतात. त्यांना सत्पंथ काय आहे हे सुध्दा माहित नाही. एवढे असूनसुध्दा आमीशाच्या हेतूने व पगाराच्या हेतूने त्यांनी ठेवलेले मुखी व कामदार हे मुळच्या सत्पंथ, इमामशाह महाराजांनी उपदेशिलेला सत्पंथ सोडून या सय्यदाचा संमिश्र धर्म अर्धदग्ध सतपंथ लोकांना शिकवू लागले व त्याच अर्धदग्ध सतपंथाचा प्रचार सर्वत्र करू लागले. मध्यप्रदेश व रावेर तालुका, चोपडा तालूका वगैरे ज्या ज्या ठिकाणी बहाद्दरपूरच्या मुखींचा व कामदारांचा संपर्क आला त्या त्या ठिकाणी लोकांनी अर्धदग्ध सत्पंथाचा स्विकार करून पालन करू लागले. राज्य शासन ही त्यांना अनुकुल असल्याने राजदरबारात सुध्दा त्याच लोकांचे वजन पडले. हळूहळू इमामशाहांचा सनातन सत्पंथ मागे पडला व बहाद्दरपुरच्या शाखेची भरभराट होवू लागली.

धर्मपीठ फैजपूर येथील परंपरागत चालू असलेला सनातन सत्पंथावर या गोष्टीचा विचार खूप खोलवर परिणाम होऊ लागला. इ.स. १९२२ ते २४ मध्ये फैजपूर येथील खंडेराव वाडीचा आत्मानंद महाराज याने बहाद्दरपूर व पीराणा येथे .जाऊन पीराण्याच्या सैय्यदांना भेटून खोटा आळ आरोप सत्पंथावर केल्याकारणाने समाजात सत्पंथी लेवा पाटीदार व बीना सत्पंथी लेवा पाटीदार असा तळ पडला व १४ वर्षे पर्यंत सत्पंथी लेवा पाटीदार लोकांना जातीच्या बाहेर राहून रोटी बेटी व्यवहार तोडण्यात आला. कुंवारीका सोयरीकी मोडल्या गेल्या अत्यंत हाल अपेष्टेचे व लाजिरवाणे जीवन सत्पंथ समाजाला जगावे लागले.

समाजाच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सत्पंथाचे अध्वर्यु श्री.तोताराम बधु महाजन यांनी आपल्या समाज बांधवांचा तोल सांभाळण्याचा आटोकाटप्रयत्न केला. जगद्‌गुरू शंकराचार्यांना स्वतः भेटून त्यांची विनवणी करून त्यांना सत्पंथाचे सर्व शास्त्रे दाखवून सत्पंथ धर्म हा वैदिक धर्म आहे हे सिध्द करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. प्रथम तर शंकराचार्यांनी ही गोष्ट उडवूनच दिली. पण दैनिक केशरी व वर्धा येथील हिंदुमहासभा मंडळ यांनी विनवणी करून सत्पंथ धर्म हा वैदिक सनातन धर्मच आहे अशा प्रकारची मान्यता शंकराचार्यांनी दिली. या सर्वांच्या मुळाशी श्री. तोताराम बधु महाजन ह्यांचेच प्रयत्न कारणीभूत होते. तशा काळात ते सर्व उच्चभ्रु लोकांना भेटले. धर्ममार्तंडांना भेटले, पुढाऱ्यांना भेटले व सर्वांचे अभिप्राय मिळविले. सत्पंथाची

धर्मध्वजा स्थिर राखण्याचा प्रयत्न यशस्वी करून दाखविला. खरोखर ते धन्यतेस पात्र आहेत.

अशा प्रकारचा हा धर्मपीठ फैजपूरचा इतिहास आहे. सत्पंथ धर्मपीठ पीराणा, धर्मपीठ देवा व रूण यांचे आचार्य एकच आहे, धर्मपीठ कुकस हे तीन प्रसिध्द आहेत कारण ते सद्गुरू इमामशाह महाराजांच्या कारकिर्दीत स्थापन झालेली आहेत. पण धर्मपीठ फैजपूर हे सोळाव्या शतकात स्थापन झालेली असल्यामुळे व तेथील आचार्य हे प्रसिध्दी पराईमूख राहिले म्हणून सत्पंथाच्या इतिहासात धर्मपीठ फैजपूर हे नांव येऊ शकले नाही. पण आजतागायत या धर्मपीठ फैजपूरच्या गादीवर बालब्रह्मचारीच गादीवर आलेले आहेत तसे पीराणा, भाभाराम, नायाकाका यांच्या गादीदारांची स्थिती नाही हे विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे.

असे धर्मपीठ फैजपूरच्या इतिहासावरून सत्पंथ साहित्याचा सुध्दा विचार मिळतो म्हणून तो अत्यंत महत्त्वाचा इतिहास आहे. त्याबद्दल कोणाला काही शंका असल्यास तेथील आचार्यांच्या निदर्शनास आणून दिल्यास सुधारणा होऊ शकेल, अशी त्यांची कळकळीची विनंती आहे.

सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

धर्मपीठ फैजपूर येथील मंदिराचा संक्षिप्त इतिहास

(आचार्य श्री जगन्नाथ महाराज यांच्या लिखाणातून)
संकलक - सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

परमपूज्य सद्गुरूवर्य श्री इमामशाह महाराज यांची कारकिर्द इ.स. १४४० ते १५०० ही आहे. त्यांच्या जीवनवृत्तान्त ग्रंथात असा संबंध आहे की ते गुजराथमध्ये धर्म प्रचारार्थ फिरत असता इ.स. १४६० च्या सुमारास खंबायतला आलेले होते. तेथील लोकांना काही दिवसपर्यंत धर्मोपदेश करून ते पुढे बडोद्यास गेले. तेथे काही दिवस राहून नंतर चांपानेरला गेले. चांपानेर हा चंपावती नदी तीराचा अतिशय सुंदर परिसराचा भाग आहे. सुंदर सुपिक जमिन व वनराई यांनी युक्त या परिसरात कपाशी, ज्वारी, गहू व हरबरा ही पीके घेतली जात. आजुबाजूला पर्वत राई असल्याने वेळेवर पाऊस पडून भरघोस पिक येई. लोक सुखी व समृध्द होते. सद्गुरू इमामशाहाचा बराच काळ येथे धर्मोपदेशात गेला. या विभागात मुख्य दैवत म्हटले म्हणजे पावागडची महाकाली अथवा भद्रकाली हेच होते.

पावागड हा ऐतिहासिक अजिंक्य डोंगरी किल्ला पंचमहाल जिल्ह्यातील कलोल तालुक्यात असून बडोद्याच्या पूर्वेस २८ मैलावर आहे. तेथे नवरात्र महोत्सवात भद्रकाली देवीची मोठी यात्रा भरते. जुन्या शिलालेखात या गडाला पावकगड अथवा पवनगड असे नाव आहे.

प. पू. सद्गुरू इमामशाह महाराज तेथे गेले त्या सुमारास पताई घराण्यातील जयसिंह राव हा तेथील कारभार पहात होता. सद्गुरू महाराज पुष्कळ दिवसपर्यंत तेथे राहिले. तेथे त्यांनी लेवा पाटीदार, कडवापाटीदार, राजपूत, गुजर वगैरे जमातीतील अनेक लोकांना धर्मोपदेश करून सत्पंथाची दीक्षा दिली. तेथून ते पिटलाद तालुक्यात देवा गांवी गेले व नंतर तेथून अमदाबादेस गेले असा त्यांच्या जीवनवृत्तान्तात संबंध आहे. अशा प्रकारे गुजराथेत त्यांचा प्रचार दौरा जास्त प्रमाणात झाला व पुष्कळ समाजाचे जातीतील हिंदु लोकांना त्यांनी निरीच्छ बुद्धिने वैदिक धर्माचा तत्त्वोपदेश केला.

सद्गुरू महाराज पावागडाहून गेल्यानंतर सुमारे २४ वर्षांनी त्या परिसरातील जनतेवर फार मोठी आपत्ति कोसळली. इ.स. १४८४ च्या ते १५१० या काळात सुलतान महंमद बेगड्याने पावागडावर स्वारी केली व तेथील जयसिंह पताई राजाचा वध केला. त्याच सुमारास त्याने सौराष्ट्रातील जुनागडावरसुद्धा स्वारी करून तो गड सुद्धा हस्तगत केला म्हणून त्यास बेगडा या नावाने संबोधले जाते. त्या युद्धाच्या वेळेस पंचमहाल भागातील जनतेस अनंत हाल सोसावे लागले. कित्येक लोकांनी तेथून निघून अन्यत्र व्यवसाय धंद्याकरिता प्रयाण केले.

पावनगडाच्या या विनाशास कारणीभूत अशी एक दंतकथा भाटलोक सांगतात की राजा जयसिंहावर काही कारणामुळे भद्रकाली देवीचा कोप होऊन शाप झालेला होता की थोड्याच दिवसाचे आत तुझा व तुझ्या राज्याचा विध्वंस होईल. त्यामुळे तेथील जनतेने आपल्या पुढच्या जीवन विषयक समस्येचा विचार करून ती भूमि

सोडली. आपल्या मातृभूमिचा त्याग करतांना त्यांना अपरिमित दुःख झाले. ज्यांनी तेथून आपला व्यवसाय धंदा करण्याकरिता इतरत्र प्रयाण केले त्यांच्या पैकी एक मोठी तुकडी महाराष्ट्रात आली.

सद्‌गुरू इमामशाह महाराज पूर्वी मध्य प्रदेशाकडून महाराष्ट्राच्या परिसरात मराठवाड्याकडे आकोट अकोला, सुरजी, अंजन वगैरे विभागात जाऊन बरेच दिवस राहिल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात आढळतो. नंतर दक्षिण महाराष्ट्रात कोचरब भागात जाऊन त्यांनी निजाम राजाचा गर्व भंग केल्याचा उल्लेख आढळतो. नंतर लाछोरा, खानदेश, फैजपूर, सोनगढ, वगैरे विभागातून धर्मप्रचार करीत करीत ते गुजराथकडे नवसारी, सुरत, कानम, खंबात, भावनगर, जुनागड, राजकोट, बडोदा, पंचमहाल, पेटलाद, देवा वगैरे भागात गेले व नंतर पिराण्यास स्थिर झाले असा उल्लेख त्यांच्या जीवन वृत्तांतात येतो.

ज्या ज्या ठिकाणी सद्‌गुरू इमामशाह महाराज गेले त्या त्या लोकभाषेतून लोकांना त्यांनी धर्मोपदेश केला असा उल्लेख आहे. पण महाराष्ट्रात त्या वेळेस जे लोक होते त्यात भावसार, माळी, बारी, मराठा, सोनार, तांबटकर, हटकर, राजपूत वगैरे जाती जमातींच्या लोकांत त्यांनी हिंदु धर्माचा उपदेश केला. इमामशाहांनी उपदेश देण्याच्या आधी काही लोक कोणी वारकरी, कोणी महानुभाव होते. तर कोणी भरकटलेल्या अवस्थेत भगत भोप्यांच्या नादी लागून निकृष्ट देविदेवतांच्या उपासनेत गुरफटलेले होते पण इमामशाहांनी त्यांना सत्यमार्गावर आणून सोडले व ते तेव्हापासून आजतागायत पर्यंत सत्पंथाचेच परंपरेने पालन करीत आहेत.

इ.स. १५ व्या शतकाच्या शेवटी पावागडाहून खानदेशाकडे जी मोठी तुकडी आली त्यात लेवा पाटीदार, राजपूत व गुजर लोकांचा भरणा अधिक होता व ते त्यात बहुशः सत्पंथी लोकांचाच अधिक भरणा होता. अमळनेर, एरंडोल तालुक्यातील नांदेड साळवा या गावाजवळ त्यांनी मुक्काम केला. नंतर कालांतराने यावल तालुक्यातील पाडळसे भोर गावी त्यांचा दुसरा मोठा तळ पडला व तेथून चिनावल, फैजपूर, उटखेडा, विवरा, रोझोदा, मस्कावद, आमोदा, बामणोद, राजोरा, खडका, कंडारी, वरणगांव, तळवेल, पिंपळगाव, धानोरा, जांभोरा, अशाप्रकारे यावल व रावेर परगणात हे लोक उद्योग धंदा, शेती व्यवसायाकरितां विखुरले गेले. कित्येक लोकांना जमिनी, वतने, कामधंदा, नोकरी, चाकरी, मिळाली तसतसे यावल, रावेर, भुसावळ, जळगाव, मलकापूर, खामगांव, एरंडोल, चोपडा वगैरे तालुक्यात कायमचे रहिवासी झाले. काही लोक वऱ्हाड, निमाड, पश्चिम खानदेश वगैरे ठिकाणी जाऊन तेथेच राहू लागले. ह्या लोकांची मुळची गुजराथी भाषा जाऊन ते मराठी बोलू लागले.

पावागडाहून खानदेशात आलेल्या लोकांत लेवा पाटीदार समाजात बराच मोठा भाग सत्पंथ पाळणारा होता, गुजराथेत लेवा पाटीदारात आजमितीस सुद्धा सत्पंथाचे अनुयायी पुष्कळ प्रमाणात आहेत. ते ही आपल्या पूर्वजाच्या धर्मपंथाप्रमाणे वागत आहेत. खानदेशात लेवा मध्ये सत्पंथाप्रमाणे इतर पंथ पाळणारे लोक आहेत. उदा. वारकरी, स्वामिनारायण, नाथपंथ, महानुभाव वगैरे अनेकानेक धर्मपंथ पाळले जातात व त्यात आपापसात रोटीबेटी व्यवहार चालू आहे. खानदेशात आलेल्या लेवा पाटीदारामध्ये बरीच कुटुंबे सत्पंथी

अनुयायांची होती. त्यात साधारणतः नारखेडे, कोल्हे, होले, किरंगे, भारंबे, बोरोले, पाटील, महाजन, इंगळे, भिरूड, झोपे, तळेले, बोंडे, नेमाडे, ठोंबरे, राणे वगैरे कुळातील भीन्न भीन्न गोत्रजांचा भरणा होता.

फैजपूर व आजूबाजूच्या पंचक्रोशीत घरे घेऊन वस्ती करून शेती, नोकरी, चाकरी, उद्योगधंदा करणाऱ्या सत्पंथी कुटुंबीयांची एकदा इ.स. १५९८ च्या सुमारास श्रावण शुद्ध १५ मे स सभा भरली. त्या सभेत असे ठरले की सत्पंथ तत्त्वानुसार पूजा अर्चा करण्याकरितां एक घर घ्यावे व तेथे आपल्या पंथाची शिकवण लोकांना द्यावी. विचार विनिमय करता करता सहज दोन वर्षे आणखी लोटली गेली व फैजपूर हेच पंथाचे केंद्र ठरून तेथेच मंदीर बांधण्याच्या उद्योगास लोक लागले. त्या करितां लोकांनी जागा निवडली व भक्तिभावाने पूजन करून एक मोठी दुमजली इमारत बांधली. धर्माची शिकवण जिथे दिली जाते ती धर्मशाळा पूजा अर्चेकरिता खालच्या तळावर एक मोठा हॉल व वरच्या मजल्यावर बाहेर गावाहून पूजेअर्चेस येणाऱ्या लोकांची उतरण्याची व्यवस्था याकरिता दोन खोल्या बांधल्या. त्याच्या उद्घाटनाकरितां इमामपूरहून आचार्य सोमजी काका हे आले. इ.स. १६०० मध्ये मार्गशिर्ष शुद्ध पौर्णिमेला गुरूवारी सर्व गांवोगावचे लोक आले, मोठा उत्सव झाला. त्या सभेत सोमजी काकांनी उद्बोधन केले. त्यांनी सांगितले,

'' हे सत् अविनाशी परब्रह्माच्या सेवकांनो! आज आपण सर्व गावोंगावचे सत्पंथी बांधव या फैजपूर येथील धर्मशाळेत एकत्रीत जमलेलो आहोत. सत्पंथावर व सद्गुरू महाराजांच्या मार्गदर्शनावर तुम्हा सर्वांची दृढमूल श्रद्धा आहे व त्या श्रद्धेपोटीच आज या गांवात

धर्मशिक्षण देणारी व सत्पंथ तत्त्वानुसार घटपाट पूजा करण्याकरिता या मंदीराची निर्मिती झालेली आहे. पावागडाहून एवढे लांब येऊनही तुम्ही आपली निष्ठा जोपासली आहे. खरोखर तुम्ही सर्व सत्पंथी बांधव धन्यतेस पात्र आहात. पीराण्याहून ही धर्मध्वजा व अखंड ज्योतीचे प्रतिक हे महाराष्ट्र राज्यात फैजपूर या ठिकाणी आम्ही आणलेले आहेत. या ठिकाणी महाराष्ट्रात एकमेव तीर्थधाम म्हणून सत्पंथी मंदीराची स्थापना करावी हा आमचा मनापासून हेतु आहे व तो हेतु तुम्ही सर्व सत्पंथी बांधव पूर्णत्वास न्याल ही आमची खात्री आहे.

सत्पंथ धर्मतत्वानुसार पीराणा (गुजराथ) येथे मुख्य गादी सद्‌गुरू इमामशाह महाराजांनी स्थापन केलेली आहे. त्या गादीचे आम्ही शिष्य परंपरेने चौथे वारस आहोत. इ.स. १४९० मध्ये सद्‌गुरूंनी ही गादी स्थापन करून पू. शाणाकाकांना मुख्य गादीदार म्हणून नेमले व संस्थानची संपूर्ण वहिवाट त्यांच्या ताब्यात दिली व तेव्हा पासून आम्ही शिष्य परंपरेने बालब्रह्मचारी आर्चक ही गादी सांभाळीत आहोत. त्याचप्रमाणे कुकस (गुजराथ) येथे संत श्री नायाकाकांची गादी, देवा (गुजराथ) गांवी संतयोगी भाभारामची गादी व रूण (गुजराथ) येथे संतसाध्वी कीकीबाई मातेच्या गादीची स्थापना झालेली आहे. प्रत्येक देवस्थान अलग अलग रूपाने आपापल्या संत महात्म्यांची सेवा करीत आहे. तद्वत महाराष्ट्रात फैजपूर येथे सद्‌गुरू इमामशाहांची व प्रभु श्री निष्कलंकी नारायणाची उपासना करणारी गादी स्थापन करावी व परंपरेने गुरू शिष्य रूपाने त्या गादीची वहिवाट चालवावी असे आमचे मत आहे. त्या नुसार तुम्ही सत्पंथी बांधव विचार विनिमय करा व सात दिवसाच्या आंत तुमचा काय संदेश असेल तो मला कळवा.

काम सफल झाल्याशिवाय आम्ही येथून जाऊ शकणार नाही. धन्यवाद.''

इ.स. १६०० मार्गशिर्ष व ॥ अष्टमी शुक्रवार रोजी धर्मशाळेत सर्व सत्पंथी लोक आणि त्यांचे आप्तइष्ट लोक जमले. सर्वांनी मनापासून पू. सोमजी काकांनी सांगितल्याप्रमाणे गादी स्थापन करण्याचा एकमताने निर्णय जाहिर केला. सर्वांना आनंदी आनंद झाला. सर्वांनी एकमताने आपले अध्वर्यु फैजपूर येथील धर्मदासजी महाराज यांनाच नेमावे व गादीची वहिवाट करावी असे ठरविले. धर्मदासजी हे भारंबे कुळातील होते ते आजीवन ब्रह्मचारीच होते व समाजात त्यांचे वजन असल्याने त्यांनाच आपण आपला पुढारी व काका करावे असे सर्वानुमते ठरले. पू. सोमजीकाकांनी त्यांना भगवा फेटा बांधून मुख्य गादीदार म्हणून नेमले व त्यांच्या ताब्यात ही सत्पंथी संस्थान फैजपूरची वहिवाट सोपविली. पू. सोमजी काकांचा मुक्काम एक महिनाभर होता. ते पीराण्याहून घोड्यांच्या बग्गीत आलेले होते. त्यांच्या बरोबर पीराण्याकडचे ५० जण कोणी घोड्यावर तर कोणी टांग्याने आलेले होते. त्या सर्वांची उत्तम रीतीने बडदास्त ठेवून प्रेमाने निरोप दिला.

१) आचार्य श्री धर्मदासजी महाराज :-
(इ.स. १५४० ते १६०५)

पू. धर्मदासजी महाराज हे मुळचे फैजपूर येथील राहणारे. भारंबे कुलाचे कुलदीपक बालब्रह्मचारी आर्चक झाले. इ.स. १६०० मध्ये गादीवर स्थानापन्न झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्पंथी बांधवांची संघटना कायम राहावी म्हणून खेडोपाडी भटकून लोकांना धर्माचा उपदेश दिला. आमोदा, बामणोद, राजोरा, चिनावल, उटखेडा, विवरा, मस्कावद, सावदा, रोझोदा, खडका, कंडारी, पिंपळगांव (ता. भुसावल) आसोदा, भादली (ता. जळगांव) पिंपळगाव गोलाईत (ता. जामनेर) नांदेड, साळवा (ता. एरंडोल) खामगांव, मलकापूर, बोदवड, अकोट, अकोला, सुरजी, अंजनगांव वगैरे ठिकाणी जाऊन तेथील सत्पंथी बांधवांना आश्वासन, धैर्य देऊन पंथ संघटना कायम ठेवली. ठिकठिकाणी त्यांनी घटपाट पूजेकरितां गावोगाव देवघरांची स्थापना केली व तेथेच ते लोक पूजाअर्चा विधी करू लागले मात्र मुख्य ठिकाण फैजपूर म्हणून येथे उत्सवाचे वेळेस एकत्र येऊन सामुहिक पूजा, भजन, वगैरे करून पंथ संघटना कायम ठेवली. दि. १६०५ चैत्र व ॥ बीजेच्या दिवशी त्यांचे महाप्रयाण झाले. त्यावेळेस प्रेमानंद महाराज हे गादीदार नियुक्त झालेले होते.

२) आचार्य श्री प्रेमानंदजी महाराज :-

(इ.स. १५७० ते १६३२)

हे बालब्रह्मचारी आर्चक बामणोद येथील राहणारे, झोपे कुळातील होते. आचार्यपदावर त्यांची नियुक्ति भाद्रपद शुद्ध द्वादशीचे दिवशी इ.स. १६०२ मध्ये झाली. गुरू धर्मदासजी महाराज निवर्तल्यानंतर त्यांनी बऱ्याच सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. सत्पंथी समाजात व बाहेरच्या समाजातही त्यांनी विशेष लक्ष घालून कामे केली. त्यांना ठिकठिकाणचे लोक येऊन शेती विषयक प्रश्न विहीरींना पाण्याचा प्रश्न विचारीत असत त्यांचे आगमन ज्या शेतात होत असे त्या शेतात समृद्धी होत असे. आचार्यांच्या आदेशानुसार बऱ्याच लोकांनी शेतीवाडी करण्याकरितां निरनिराळ्या गावी प्रयाण केले व ते सर्व त्या त्या ठिकाणी समृद्ध झाले. इ.स. १६३२ च्या ज्येष्ठ शुध्द दशमीच्या दिवशी त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

३) आचार्य श्री भगतरामजी महाराज :-

· (इ.स. १६१० ते १६७८)

इ.स.१६२० आषाढ शु ।। पौर्णिमा गुरूपौर्णिमेस मोठा उत्सव होऊन गुरूवर्य भगतरामजी महाराज यांचा दीक्षादान समारंभ झाला. ते राजोरा येथील रहिवासी नारखेडे कुळात जन्मास आलेले होते. वयाच्या १० व्या वर्षांपासूनच त्यांना भजनपूजनाची ओढ लागली असल्याने त्यांचे वडिल रामदास व आई उमाबाई यांनी श्री सत्पंथी मंदीर संस्थानात त्यांना अर्पण केले. आचार्य प्रेमानंदजी महाराज निवर्तल्यावर मुख्य आचार्य म्हणून ते गादीवर स्थानपन्न झाले. त्यांच्या वेळेस ४/५ लोक मुखी म्हणून पूजाअर्चा करीत असत. त्यामुळे गावोगाव पूजा होऊ लागल्या व धर्म संघटना उत्तम प्रकारे जोपासली गेली.

इ.स. १६६१ च्या सुमारास बऱ्हाणपूर येथील सुभेदार उल्त-मुल्क याने बंड पुकारल्याने त्याचा निप्पात करण्याकरिता शिवाजी महाराजांचा सुभेदार मनखोजी पवार यांचा मुक्काम फैजपूर येथे पडला. बऱ्हाणपूरचा भुईकोटकिल्ला व अशिरगड जिंकण्याकरितां त्यांनी चढाई केली पण बऱ्हाणपूरच्या सुभेदाराने ऐनवेळी माघार घेऊन खूप मोठी प्राणहानी वाचविली. त्याच सुमारास सद्गुरू इमामशाह महाराजांच्या भावांच्या परिवारातील ''महंमदशाह दुले'' ह्या पवित्र अंतः करणाच्या महापुरूषाचे आगमन बऱ्हाणपूरला झाले. एकदा सकाळच्या मंगलप्रभाति महंमदशाह दुले हे तापी नदीतीरावर तोंड धूत बसले असतांना सुभेदाराची स्वारी समोरच्या तिरावरून हत्तीवर पालखीत बसून आली. दुले महापुरूषास काय वाटले आणि काय नाही ते ज्या

दगडावर बसले होते तो दगडही हत्तीच्याच आकाराचा प्रचंड दगड होता. महापुरूषाने मनातल्या मनात भगवंताची आराधना केली व दगडास सांगितले 'चल बे मेरे हाथी सामने जो सुभेदार आया है उसको मिलके आयेंगे' त्यांच्या मुखातून अशी वाणी बाहेर पडताच तो दगडाचा हत्ती चालू लागला तोपर्यंत सुभेदार सुद्धा हत्तीवरून नदीच्या मध्यभागी आलेले होते. दोघांची भेट नदीच्या मध्यभागी झाली. महापुरूषाची अपरिमित शक्ति म्हणजे चमत्कार पाहून सुभेदार आश्चर्यचकित झाला व त्याने लोणी बहादरपूर येथे जमीन देऊन वचन दिले व तेवढी जमीन करमुक्त केली. तेथेच त्या महापुरूषाचा दर्गा आहे.

तेथे त्या महापुरूषाने वास्तव्य करून अनेक चमत्कार लोकांना दाखविले. हळू हळू आजू बाजूच्या पंचक्रोशीतील गावप्रमुखांना एकत्र जमवून त्यांना मुखी नेमून त्यांच्या मार्फत त्यांनी सत्पंथाचा प्रचार व प्रसार सुरू केला. चमत्कारांचे पाठबळ त्यांच्या अंगीच असल्याने सर्व हिंदुलोक आपोआप तिकडे ओढले गेले. थोड्याच दिवसात गांवोगांव म्हणजे संपूर्ण निमाड जिल्हा, मध्यप्रदेश त्यांच्या सत्पंथी अनुयायांनी व्यापला. त्यात साधारणतः मराठा, गुजर, प्रजापति, माळी, साळी, कोष्टी, तांबोळी वगैरे जमातींची संख्या अधिक आहे. क्वचित परिट सुतार, चांभार व धनगर आदिवासी लोक सुद्धा या पंथात आहेत. कालांतराने महंमद दुले यांनी बहादरपुर येथे गादी स्थापन केली व वंश परंपरेने ते लोक गादीवर स्थानापन्न झाले. ते सर्व गादीदार इस्लाम धर्म पाळतात मात्र त्यांचे गांवोगांवचे मुखी व अनुयायी हिंदु धर्माचे पालन करतात.

४) आचार्य श्री गुरूवर्य पंडितजी महाराज :-
(इ.स. १६२५ ते १७१२)

गुरू पंडितजी महाराज हे चिनावल येथील रहिवाशी राणे घराण्यातील होते. इ.स. १६६० च्या कार्तिक शु ॥ एकादशीच्या दिवशी मोठा उत्सव होऊन गुरू पंडितजी महाराज हे आचार्य पदावर विराजमान झाले. त्यांच्या कारकिर्दीत गावोगांव मुखी तयार झाले. त्या सर्वांना गुरू पंडित महाराजांचे मार्गदर्शन लाभले. रोज सकाळी देवघरात सर्व सत्पंथी अनुयायांनी एकत्रित येऊन पूजा करावी. दुपारी कामधंद्यातून निवृत्त झालेले वृध्द व स्त्रिया मंदीरात येऊन संध्यावंदन करायची. संध्याकाळी आरती उदधूप सेवा करण्याकरीता व रात्री १० वाजता पूजेकरिता सत्पंथी बांधव एकत्र जमत. दर श्रावण महिन्यात पोथीवाचन होई. गुढीपाडवा व थाऊरबीजेच्या दिवशी गावोगांवचे अनुयायी लोक फैजपूर येथे येऊन उत्सव साजरा करीत असत.

आसोदा येथील श्री प्रेमजी मुखी यांनी गुरूमहाराजांची परवानगी घेऊन पीराणा येथे दोन वर्षे राहून तेथील मुळबंध ग्रंथाचा उतारा करून आणला. मूळबंधाची मुळची भाषा संस्कृतमिश्रीत गुजराथी व लिपीसुध्दा गुजराथी मोडी होती. त्यांनी देवनागरी लिपीत पहिल्यांदाच त्याचा उतारा केला. त्यातील गुरूवाणी, योगवाणी, अमृतवाणी, आगमवाणी यातील पदे ठिकठिकाणी म्हणून त्यांचा अर्थ सांगून लोकांच्या ज्ञानात भर टाकली.

५) आचार्य श्री अमृत महाराज :-

(इ.स. १७०२ ते १७७२)

गुरू श्री अमृत महाराज यांचे मूळचे जन्मगांव रोझोदा असून बोंडे परिवारातील ते होते. गादीवर येण्याचा त्यांचा काळ इ.स. १७२४ चैत्र वद्य अष्टमी हा होता. त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात खूप मोठा दुष्काळ पडला. सारखे चार-पाच वर्षे पाऊसच पडला नाही. गुरांना चारा नाही, लोकांना अन्न नाही अशा अन्नान्न दशेत दोन-तीन वर्षे लोकांनी कसा तरी तग धरला. पण कित्येक लोकांनी ठरविले की आपण गुजराथमध्ये जाऊ व काहीतरी उद्योगधंदा, शेतमजूरी करू. खानदेश, वऱ्हाड, मराठवाडा वगैरे विभागातून सत्पंथी अनुयायी आले. तो काळ साधारणतः इ.स. १७४९ ते १७५३ चा काळ होता. मंदीरात सर्व सतपंथी अनुयायी जमले. मंदीरात त्याच वेळेस एक सुफी संत फिरत फिरत दरवेशाच्या रूपाने आला. त्याने गुरू अमृत महाराजांची भेट घेतली. महाराजांच्या व त्या संताच्या काही गोष्टी झाल्या व तो दरवेशी निघून गेला. महाराजांनी सांगितले आपण देवाला साकळे घातल्याशिवाय आपल्यावरील संकट निवारण होणार नाही. सातदिवस पर्यंत दिवसा सत्वाणी ग्रंथाचे वाचन दररोज सकाळी व संध्याकाळी कळशपूजा अशाप्रकारे सातवी पूजा झाली. आणि मध्यरात्रीपासून वरूण देव प्रसन्न होऊन जिकडे तिकडे मुसळधार पावसास सुरवात झाली एकसारखी वृष्टी होऊन सात दिवसात जिकडे तिकडे नदी नाले विहीरी तुडूंब भरल्या. संपूर्ण महाराष्ट्रात वृष्टी होऊन

आनंदी आनंद झाला. चार वर्षाचा दुष्काळ निवारण झाला. योग्यवेळी शेती तयार झाली. पिके आली व समृद्धता झाली. गुरू अमृत महाराजांनी सांगितले तो जो दरवेशी होता तो हाजरबेग महाराज होता व त्यांनीच हा उपाय सुचविला.

६) आचार्य श्री दगडू महाराज :-

(इ.स. १७५५ ते १८३१)

फैजपूर येथील संस्थानचे सहावे आर्चक गुरू दगडू महाराज हे फैजपूर येथील बोरोले कुळातील होते. बालपणीच त्यांच्या वडिलांनी संकल्प केला होता की, मला जो पहिला मुलगा होईल त्यासं मी भगवंताच्या सेवेत अर्पण करीन. त्याप्रमाणे वयाच्या ११ व्या वर्षीच त्यांना मंदीरात आर्चक म्हणून अर्पण केले. आश्विन शुद्ध पौर्णिमा इ.स. १७६६ रोजी मोठा उत्सव होऊन त्यांना आर्चक बनविले.

इ.स. १७७२ च्या मार्गशिर्ष शु ।। द्वादशीच्या दिवशी श्री सत्पंथी मंदीरात सात दिवसांचा सप्ताह साजरा झाला. आजूबाजूच्या पंचक्रोशीतील सत्पंथी लोक तर सप्ताहास हजर होतेच पण इतर पंथातील मंडळीही या सप्ताहात सामिल झाले. त्यावेळेस पीराण्याहून पू. प्रागजी काकांना संदेश पाठवून सप्ताहाच्या सांगतेकरिता बोलवून घेतले पू. प्रागजी काका अत्यंत हुशार तल्लख बुद्धीचे व सुधार मताचे असल्याने त्यांनी ताबडतोब खानदेशचे आमंत्रण स्विकारले. प्रथम सुरूवातीस ते सुरत येथे दोन महिने पर्यंत थांबले व मार्गशिर्षात फैजपूर येथे आले एक महिनाभर त्यांचा फैजपूर येथे मुक्काम होता. त्यावेळेस त्यांनी खानदेशातील आपले सत्पंथी अनुयायी कसे राहतात, कसे वागतात, त्यांचा व इतर पंथीयांचा रोटीबेटी व्यवहार कसा चालतो हे सर्व त्यांनी अवलोकन केले. मार्गशिर्ष वद्य पंचमीच्या दिवशी सप्ताहाची सांगता झाली. त्यावेळेस पू. प्रागजीकाकांनी उद्बोधन केले की,

''फैजपूर येथील शिष्य परंपरागत चालणाऱ्या गादीला व

धर्मध्वजेला वंदन करून मी आपणास काही उद्बोधन देत आहे ते स्वीकारावे. फैजपूर येथील सत्पंथी अनुयायी प.पू. इमामशाहांना सद्गुरू म्हणजे सत् मार्गदर्शक युगगुरूचे ठिकाणी मानतात. त्यांनी दर्शविलेल्या पूर्ण सनातन वैदीक मार्गाचेच अवलंबन करतात. सतपंथाच्या मुख्य सिध्दांतानुसार श्री आद्य नारायण, आद्यशक्ति अथवा योगमाया, ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर ह्या इष्ट व आराध्य देवतांचे पूजन करावयाचे असते. श्रीविष्णु भगवंताचे दहा अवतार पूज्य मानून युगधर्मानुसार दहाव्या अवताराची निष्कलंकी नारायणाची भक्ति करावी. त्याचबरोबर इतर देव देवता ह्या सर्व एकाच विराट स्वरूप भगवंताच्या अंशभूत विभूती आहेत हे जाणून त्यांना वंदन करून त्यांचा कृपाशिर्वाद मिळविण्याकरिता मंत्रोपचाराने त्यांची आराधना करावी, असे सद्गुरू इमामशाह महाराजांचे प्रतिपादन आहे. कलशपाट, घृतज्योतीची पूजाविधी अथर्ववेदाच्या मंत्रानुसार करतात. मंत्र सद्गुरू महाराजांनी अथर्ववेदावरून लोक भाषेत म्हणजे गुजराथी भाषेत केलेले आहेत. पूजेच्या वेळेस अखंड घृतज्योतीचे, ईश्वराच्या निर्गुण निराकार तेजस्वी स्वरूपाचे ध्यान करण्याचा नियम आहे. पूजाविधीत ध्यान धारणेस व मन एकाग्र करण्यास अतिशय महत्त्व आहे. त्याचप्रमाणे प्रणव ब्रह्म ॐ चे नित्य स्मरण करण्याचे सद्गुरू महाराजांचे प्रतिपादन आहे.

कलश पूजा हे ब्रह्मपूजेचे व अमृतत्त्व प्राप्तीच्या मार्गाचे प्रतीक आहे. परब्रह्म परमेश्वराने जेव्हा सृष्टीच्या उत्पत्तीचा संकल्प मनात धारण केला तेव्हा सर्वप्रथम संकल्पमात्र ब्रह्मदेवास निर्माण केले व त्यास एक अमृत कलश देऊन सृष्टीची रचना करण्यास सांगितले.

ब्रह्मदेवाने त्यानुसार कलशातील अमृतबिंदू शिंपडून संकल्प करून सृष्टीतील एकेका पदार्थाची निर्मीती केली. प्रथम त्या अमृत बिंदूद्वारे संकल्प करून पंचमहाभूते निर्मिली. नंतर सृष्टीची उत्पत्ती व रचना केलेली आहे. त्या आद्य कळश घटपाटाचे प्रतीक म्हणून सद्‌गुरू इमामशाहांनी सत्‌पंथी अनुयायास हा कलश पूजापाठ विधी सांगितलेला आहे. आपल्या सर्व धर्मशास्त्रांनी सुध्दा कलशपूजेस अग्रस्थान दिलेले आहे याचे कारण हेच. पूजेच्या वेळेस घृतज्योत लावून त्याचे ध्यान करायचे असते. कारण घृत म्हणजे तूप हे सात्विक अन्न आहे. त्याचा सुगंध अत्यंत सुमधूर असतो व आरोग्य दृष्ट्या उपयुक्त असतो. पुष्टीवर्धक व तृष्टीवर्धक असतो. सात्विक शांतीच्या प्राप्तीकरिता ध्यान करण्यास योग्य वातावरण निर्मितीकरिता साजुक तूपाच्या ज्योती लावायच्या असतात. आपला आत्मा व प्रत्येक प्राणीमात्रांच्या शरिरात चैतन्यरूपाने वास करणारा आत्मा हा ज्योतीस्वरूप तेजस्वरूप असल्याने त्याच्या प्राप्तीकरिता त्याच स्वरूपातून त्याचे ध्यान करणे अत्यंत महत्त्वाचे असते.''

अशा प्रकारे बरीच माहिती प्रागजी काकांनी दिली. सर्व जण उल्हासीत झाले. त्यांनी गुजराथीतून निवेदन दिले. तोपर्यंत खानदेशची जनता आपली मूळ गुजराथी भाषा विसरून गेले होते. तरी पण बरेच लोकांत गुजराथी भाषेचा वापर असल्याने त्यांचे भाषण लोकांना आवडले. गुरू दगडू महाराजांच्या कारकिर्दीत फैजपूर येथील मुखी धनजी इसराम यांनी पीराण्यास इ.स. १८३० च्या सुमारास जाऊन मुळबंध ग्रंथाचा उतारा गुजराथी भाषेमधून करून आणला. मागे प्रेमजी मुखींनी इ.स. १७०८ मध्ये जो उतारा मुळबंधाचा झाला

होता त्यावरून या मुळबंधाचा उतारा केलेला असल्याने त्यात असलेल्या ग्रंथाच्या ओव्या, काव्य वगैरे यात फरक पडला नाही. पण पू. प्रागजी काकांनी सांगितले की आपला मुळबंध व त्यातील शास्त्राची रचना ही श्री सत्गोर ब्रह्मावाचे या नावाने सुरूवात होते. पण ''मुळबंध'' असे दुसरे नाव देऊन पंजाबी भाषेत म्हणजे सिंधी भाषेत जो ग्रंथ इमामशाहांच्या भावांच्या मुलांनी लिहीलेला आहे, त्यात अरबी भाषेची छाप पडलेली आहे, त्यापासून आपण सावध रहावे नाही तर त्याचा परिणाम पुढच्या पिढीत घातक होईल. अशा प्रकारची सुचना त्यांनी दिली.

७) आचार्य श्री झेंडू महाराज :-

(इ.स. १७७५ ते १८६०)

आमोदा येथील रहिवासी श्री झेंडू महाराज हे या संस्थेचे ७ वे गादीदार इ.स. १८०५ आश्विन शु ॥ दशमी, विजयादशमीला गादीवर स्थानापन्न झाले. ते मोठे विद्वान पंडित व विशेषतः ज्योतिषशास्त्राचा त्यांनी अभ्यास केलेला होता. त्यांच्या हाताखाली श्री जानाबुवा हे कारभारी होते. ते उटखेडा येथील इंगळे कुळातील होते. मंदीराची देखभाल येणारा जाणारांची बडदास्त ठेवणे, मंदीराच्या शेतीची व्यवस्था ठेवणे हे त्यांचे काम होते. इ.स. १७९० मध्ये फैजपूर येथील आंबेमळा श्री उदाजी बुधो झोपे याने दहा बीघे जमिन दान दिली.

श्री झेंडू महाराज यांनी आपल्या अनुयायांच्या प्रत्येक गावांला भेटी दिल्या सर्वांचे गाऱ्हाणे ऐकून लोकांना सुखी केले. इ.स. १८६० च्या सुमारास फैजपूर येथील काही भारंबे कुळातील लोकांनी दुष्काळामुळे न परवडल्याने आपली शेती व घरे विकून खडका येथे वास्तव्याला गेले तेथे त्यांनी कमी किंमतीच्या शेती घेतल्या व घरे बांधली व तेथे राहू लागले. त्यांची घरे श्री सत्पंथी मंदीराने विकत घेतली.

८) आचार्य श्री बारसु महाराज :-
(इ.स. १८३० ते १९०५)

पिंपळगाव आचेगाव अथवा तळवेल पिंपळगांव येथील कोल्हे घराण्यात आचार्य श्री बारसु महाराज हे प्रगटले व त्यांनी आपल्या अंगच्या गुणांनी संपूर्ण सत्पंथ समाजास एक वेगळेच वळण दिले. इ.स. १८५८ वैशाख शुध्द द्वादशीच्या दिवशी मोठ्या थाटामाटाने त्यांनी भगवी वस्त्रे धारण करून आचार्य पद स्विकारले. इ.स. १८६२ मध्ये सत्पंथाचे तिसरे अधिवेशन झाले. पीराण्याहून पू. पेथाकाका हे आलेले होते. त्यांच्या सोबत महाराष्ट्रातील सत्पंथी बांधवांची एकी व कार्य बघण्याकरिता जवळ जवळ ३० / ३५ लोक आलेले होते. मुख्य सभा धर्मशाळेच्या प्रांगणात भरली. त्यात उद्बोधन करतांना पू. पेथाकाका म्हणाले, सदगुरू इमामशाहांच्या शिकवणूकीनुसार वागणाऱ्या माझ्या प्रेमी सत्पंथी बांधवांनो आपण सर्व वैदिक सनातन धर्माचे अनुयायी आहोत. आपला संपूर्ण आचार विचार धर्म वैदिक पध्दतीचा आहे. एवढे असून कित्येक सैय्यद वंशाचे मुसलमानी आचार धर्म पाळणारे लोक, राजकारणी लोक आपले स्थैर्य टिकविण्याकरिता व स्वार्थाकरिता आपल्या धर्मग्रंथात अनेक ठिकाणी बदल करवून लोकांच्या श्रध्देची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. खुद्द पीराण्याच्या गादीवर शिष्यपरंपरागत वारस असल्यावर सुध्दा सैय्यद लोकांनी त्याच काकांची वेगळी विधर्मी नावे देऊन या गादीवर आमचा सुध्दा हक्क आहे असे भासविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी धर्मशास्त्रात सुध्दा बदल करून सैय्यद वंशाचे महत्त्व दाखविण्याचा

प्रयत्न केला म्हणून बांधवांनो तुम्ही वेळीच सावध रहा, कारण तुमच्या शेजारी सुध्दा त्याच सैय्यद वंशातील गादीची स्थापना होऊन त्यांची परंपरा सुरू झालेली आहे. म्हणून तुम्हाला सुध्दा विशेष रीतीने सावध रहायला पाहिजे.

सद्गुरू इमामशाह महाराजांची शिकवण वैदिक पद्धतीची असून त्यांनी सांगितले आहे की, ॐ प्रणव ब्रह्म हे आद्य अक्षर तत्त्व आहे. सर्व सृष्टोत्पत्तीच्या मुळाशी हे अक्षर ब्रह्म आहे. ॐ हे ब्रह्मबीज आहे. त्याशिवायची सर्व बीजे उदा. ऱ्हां, ऱ्हीं,ऐं, श्रीं, क्लीं, सृं आदि सर्व मातृकाबीजे आहेत. त्यांच्या स्मरणाने ती बीजे ज्या देवदेवतेची प्रतिकात्मक आहेत त्या देवतेची उपासना होते व आत्यंतिक उपासनेच्या बळावर तो जीव त्या देवतेच्या साक्षात्कारास पात्र होतो. परंतु त्या देवता अगर त्यांची फळे नाशिवंत असल्याने त्यांची उपासना करणे गौण आहे. ॐआद्यब्रह्म बीज मंत्र असल्याने त्याच्या स्मरण चिंतन उपासनेने आत्मपदाची प्राप्ती होते व त्याद्वारे मुक्ति पदाची प्राप्ति होते. अशा प्रकारे त्या सर्व गोष्टीस सत्पंथ घटपाट पूजाविधीत महत्त्वाचे स्थान दिले जाते व त्यांनी युक्त ती पूजा होत असते.

सत्य, प्रेम, पुरूषार्थ, समानभाव, अहिंसा, परोपकार व क्षमा ही सत्पंथाची मुख्य तत्त्वे आहेत. हृदयशुध्दिकरितां, हिंग, तंबाखु, अफू, गांजा, मद्य मांस या सर्व निषिध्द् व मादक वस्तूंचा त्याग, त्याचप्रमाणे परनिंदा, परस्त्रीगमन, चिंतन, सवाईव्याज, यांचाही त्याग सांगितलेला आहे. 'अहिंसा परमो धर्मः' ह्या सत्पंथाच्या मुख्य ध्येयाप्रमाणे वागणूक फारच कडक आहे. कोणास 'मार' असे म्हणणे सुद्धा दोषास्पद आहे. शरीरशुद्धीचे नियम फारच कडकपणे पाळले

जातात. प्रसुत झालेल्या स्त्रीस ४० दिवस सव्वा महिन्यापर्यंत घरातील कोणत्याही वस्तूस स्पर्श करता येत नाही. तसेच रजस्वलेस ४ दिवस घरात वापरता येत नाही . मंदीरात मंत्रोपचाराने तीर्थ, प्रायश्चित्त घेतल्याशिवाय शुद्धता होत नाही. ऋतुकालात स्त्रीयांस मंदिराच्या पायरीस सुद्धा स्पर्श करता येत नाही. एवढे कडक नियम पाळावयाचे असतात. रामनवमी, गोकुळअष्टमी, एकादशी, चतुर्दशी, शुद्धद्वितीया चन्द्रदर्शन, चतुर्थी इ. ही व्रते आहेत. गुढीपाडव्याचे दिवशी ध्वजेवर नविन निशाण चढवून ध्वजवंदन करण्याचा नियम आहे. निशाण पांढऱ्या रंगाचे व ॐ चिन्ह असलेले चढविले जाते.

गुरू आचार्य श्री बारसु महाराजांच्या काळात उटखेडा येथील श्री जयराम झेंडू बारी उर्फ जयराम मास्तर इ.स. १८५० ते १९१५ हे कारभारी होते ते संसारी होते पण अत्यंत हुशार व तल्लख बुद्धीचे असल्याने मंदीराचा संपूर्ण कारभार तेच सांभाळीत असत. त्यांनी १८६८ मध्ये मुळबंध ग्रंथाचा उतारा केला. स्वतः बारसु महाराज संस्कृत भाषेचे पंडित होते. श्रीमद्भगवत् गीता व श्रीमत् शंकराचार्यांची वाक्यवृत्ति अपरोक्षानुभूति, आत्मबोध वगैरे अनेक ग्रंथ त्यांच्या मुखोद्गत होते. एकदाचे ते प्रवचन करू लागले की तासन्तास श्रोतेजन ते ऐकण्यात दंग होऊन जात असत.

त्यांच्या उत्तर काळात म्हणजे इ.स. १८९७ च्या सुमारास फैजपूर येथील मंदीर (धर्मशाळा) अतिशय जीर्ण झालेले होते ते उकलून त्याच ठिकाणी नविन मंदीर बांधावे असे काहींचे मत होते तर कित्येकांचे म्हणणे होते की भारंबे वाड्यात जी घरे खडके येथे वास्तव्यास गेलेल्या लोकांकडून मंदीराने विकत घेतली होती त्या

ठिकाणी नविन मंदीर बांधावे. त्याच सुमारास एकदा संध्याकाळच्या वेळेस खिरणीच्या वृक्षाखाली मुले खेळत असतांना १०/१२ फुट लांबीची सुगंधीत फुलांची अचानक पुष्पवृष्टी झाली. मुलांच्या दृष्टोत्पत्तिस येताच सर्व मुले जमा झाली. त्यांनी खूप शोध घेतला पण पुष्पवृष्टी कोठून कशी झाली ते कोणालाच समजले नाही. मंदीराच्या पूर्व बाजूस कै. हुना चौधरी हे राहात होते. त्यांनी ती फुले त्यांच्या देव्हाऱ्यावर मागविली. त्यांच्या अंगात देवतेचे वारे आले. त्यांनी सांगितले या मार्गाने एक तपस्वी तेजस्वी सत्पुरूष इमामशाह नांवाचे महापुरूष अदृश्य रूपाने मंदीरात आले होते ईश्वरी अनुग्रहाने त्यांच्यावर ही पुष्पवृष्टी झाली येथेच त्यांचे सिंहासन व अधिष्ठान राहिल. सर्वांना पुष्पवृष्टीचे कारण समजले. सात दिवस पर्यंत त्या फुलांचा घमघमाट सर्व वातावरणात पसरला. गावोगांवचे लोक दर्शनाकरितां आले व सर्वानुमते सद्‌गुरू महाराजांचे अधिष्ठान येथे झाले.

भारंबे वाड्यात श्री सत्पंथी मंदीर संस्थान हे नविन मंदीर बांधले गेले. संवत १९५६ चा दुष्काळ होता म्हणजेच इ.स. १८९८-९९ च्या सुमारास मंदीराची उभारणी झाली. दोन वर्षात मंदीराचे बांधकाम पूर्ण झाले. इमारतीस लागलेला सर्व चुना राजोरा येथून आणून बामणोद येथे ढेकी करून अनुयायांनी स्वतःच्या बैलगाडीने आणला. इमारतीवरील सर्व कौल धानोरे येथून आणले. गांवोगांवचे अनुयायी लोक ८/८ दिवस येऊन श्रमदानाने काम करून जात. फैजपूर, चिनावल, राजोरा, बामणोद वगैरे गांवातील अनुयायांनी बैलगाड्या देऊन लाकुडफाटा दगड विटा वगैरे आणण्याकरितां आथाराने मदत

केली. जास्त मजुरांची आवश्यकता लागल्यास अति अल्प मजूरी घेऊन अनुयायी लोकच कामास येत असत. त्यावेळेस पुरूषास दीड आणा व स्त्रीयांना पाऊण आणा अथवा एक आणा मजूरी होती. सुतारास व बांधकाम करणाऱ्या गवंड्यास ४ ते ८ आण्यापर्यंत मजूरी होती. अशाप्रकारे इ.स. १९०० मध्ये माघ शुद्ध पौर्णिमेला मंदीरात मोठा उत्सव होऊन मंदीराची वास्तुशांति झाली. व नवीन मंदीरात पूजाअर्चा सुरू झाली.

इ.स.१९०३ च्या सुमारास बहादरपूर येथील गादीनशीन सैय्यद फैजपूरात आला तो उंचपुऱ्या घोड्यावर ५/७ घोडेस्वाराबरोबर मंदिरात आला. त्याने पू. बारसू महाराज, श्री जयराम मास्तर व इतर २/३ इसम यांना मंदीरातून बाहेर काढले व मंदीराच्या बाहेरच्या दरवाज्याला कुलुप लावले व तो जायला निघाला. ही मोंगलशाही व अरेरावी पाहून बरेच लोक जमा झाले. त्यांनी व महाराजांनी त्यास कारण विचारले, तर तो म्हणाला की ''हे मंदीर व इथले अनुयायी लोक आमच्या सत्पंथाचे आहेत. हे मंदीर आमच्या बहादरपूर शाखेचे आहे. त्यावर आमचाच हक्क आहे. हे सर्व हिन्दु अनुयायी सुध्दा आमचेच आहे''. पू. बारसु महाराजांनी सांगितले 'ह्या साऱ्या गोष्टी खोट्या आहेत. हे मंदीर आम्ही सर्व हिंदु सत्पंथीयांनी उभारलेले आमचे सत्पंथी मंदीर आहे यात बहादरपूरच्या गादीचा किंवा अनुयायांचा कोणताही संबंध नाही' महाराजांनी खूप सांगितले पण तो सैय्यद गोष्टच ऐकत नव्हता. सर्वांना आता काय करावे हेच सुचत नव्हते.

एवढ्यात मंदीराच्या पूर्वेकडीलवाड्यात गावचे पोलीस पाटील

राहात होते. कै. मनसाराम चौधरी हे त्याठिकाणी आले व त्यांनी सैय्यदास सांगितले की '' बाबा, तुम्ही कितीही शहाणे असलास तरी मंदीरास कुलूप लावू नये. त्याच्याने कधीच कल्याण होत नसते. आता मला सांगा, या मंदीराला उद्घाटन होऊन अजून ३ वर्षेही पूर्ण होत नाही तोपर्यंत तुम्ही या मंदीरावर व अनुयायांवर हक्क सांगायला निघाले पण मंदीराच्या उभारणीकरिता तुमच्या बहादरपूर शाखेने कोणती आर्थिक मदत केलेली आहे कां? बहादरपूरच्या अनुयायांनी कोणते श्रमदान केलेले आहे कां? तसे आम्हाला दाखवा. ते अथवा हे अनुयायी हिंदूच आहे पण तुम्ही आमच्या मंदीराला कुलूप लावले ते काढून टाका नाही तर सर्व अनुयायी तुमची गाढवावरून धींड काढू व सुखरूपतेने परत जाऊ देणार नाही.'

सर्व अनुयायी लोक खवळले व त्यांनी त्या सैय्यदाचा निषेध केला. त्याला गाव वेशीपर्यंत हाकून दिले.

९) आचार्य श्री धर्मा महाराज :-
(इ.स. १९०० ते १९३९)

इ.स. १९०५ पर्यंत पू. बारसु महाराजांचे सहकार्य सत्पंथी अनुयायांस लाभले. या काळात पंथ संघटनेच्या दृष्टीने अनेक महत्त्वाची कामे व धर्मप्रचार दौरे झाले. पीराणा येथून पू. रामजी काका व श्री वालजी काका ६ महिनेपर्यंत फैजपूर येथे मुक्कामी राहिले होते. त्यांनी येथील वहिवाट, पंथीयांची समाजसंघटना व सत्पंथ नियमांचे कटाक्षाने आचरण बघून अनुयायांना धन्यवाद व आशिर्वाद दिला.

इ.स. १८९५ च्या सुमारास मौजे उटखेडे येथील कै. जाना दगडू राणे यांनी सत्पंथी मंदिरात येऊन मानीत मानले की, माझ्या घरी पुत्र जन्म झाल्यास तो मी मंदिरात अर्पण करीन. काही दिवसांनी त्यांना अतिशय सुंदर तेजस्वी मुलगा झाला. आपल्या नवसास देव पावला हे बघून त्यांना फार आनंद झाला. पण माया, मोह विकाराच्या आहारी जावून देवास दिलेले वचन मोडून त्यांनी मुलास अर्पण करण्याचे नाकारले. दुर्दैवाने थोड्याच दिवसात त्या मुलाचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांना पश्चाताप झाला. त्यांनी भक्तिभावाने ईश्वरास क्षमा मागितली व एकवार मुलगा होण्याबद्दल आराधना केली. ईश्वरी संकेताने त्यांना मुलगा झाला व तो मुलगा त्यांनी मंदीरास दान दिला. धर्मास अर्पण करायचे म्हणून त्यांचे नांव 'धर्मा' हेच ठेवले. इ.स. १९०० मध्ये त्यांचा जन्म झाला. इ.स. १९०५ मध्ये पू. बारसू महाराज निवर्तल्यावर त्यांच्या पश्चात सदरहू संस्थानाची वहिवाट करण्यास त्यांनी त्यांच्या मुलास पू. धर्मा महाराजास भगवे साधु म्हणून अर्पण

केले व त्यांना मंदीरात आणले. इ.स. १९०५ च्या चैत्री पौर्णिमेस त्यांना गादिवर घेतले व त्यांचे अज्ञानपालन करणार म्हणून उटखेडा येथीलच श्री जयराम मास्तर हे मंदिराची संपूर्ण वहिवाट व देखरेख पाहू लागले.

इ.स. १९११ ची हकिकत. फैजपूर गावांतील बोहरीगल्ली कडे रात्री अचानक आग लागली. आगीचे लोळचे लोळ उसळू लागले, त्यास वाऱ्याची साथ मिळाली. आग वाढता वाढता एका बोहऱ्याच्या गोदामापर्यंत जाऊन पोहोचली. गोदामात रॉकेलचे डबे भरलेले होते. अग्निच्या योगाने ते डबेच्या डबे उसळून वर आकाशात उडत व जोराने स्फोट होऊन सर्वत्र लांबवर रॉकेल पसरले जाई व मोठा भडका होई. तो अग्नीचा लोळ कोठे पडेल याचा नेम नव्हता. झपाट्याने आग गांवच्या दक्षिण बाजुकडे पसरू लागली व थेट सत्पंथी मंदीराच्या पुढच्या घरापर्यंत येऊन भिडली. सर्व लोक अग्नीप्रलय पाहून हताश झाले. कोणास काहीही सुचत नव्हते. सत्पंथी लोकांनी मंदिरात जाऊन परमेश्वराची अनन्यप्रकारे विनवणी केली. अखेर मंदिरापर्यंत आलेल्या आगीने आपले तोंड फिरवले, हवा पालटली व आग आटोक्यात आली. ज्या आगीने ३००/३२५ घरे बेचिराख केले. तिला मंदिराचा स्पर्श होताच शांत झालेली पाहून सर्व लोक आश्चर्यचकित झाले.

इ.स. २२/११/१९२२ ते इ.स. १९३६ हा काळ महाराष्ट्रातील लेवा पाटीदार सत्पंथी लोकात अत्यंत हलाखीचा व मानहानीचा गेला.

फैजपूर येथे खंडेराव वाडीचा महंत आत्मानंद ब्रह्मचारी याने बाजारात दवंडी फिरवून ठिकठिकाणी उभे राहून सत्पंथाबद्दल अपप्रचार केला. हे लोक गोमांस भक्षक आहे, म्हणून त्यांच्याशी

रोटीबेटी व्यवहार करू नये. असे पत्रक वाटून अपप्रचाराला सुरूवात केली. शेवटी आरोप प्रत्यारोप होऊन २९-९-१९२४ रोजी आत्मानंदला दंड झाला. त्याने लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्यामुळे ५०० रू दंड व ३ महिने कारावासाची शिक्षा झाली. पण त्याचा लेवा समाजावर व सत्पंथी लोकांवर खूप खोलवर परिणाम झाला. कुवारीका सोयरीकी मोडल्या, ज्यांचे लग्न झाले होते त्यांचे माहेर अजिबात तुटले. एवढेच नव्हे तर १४ वर्षाचा वनवास सत्पंथीयांना भोगावा लागला. त्यात कारू नारू सुध्दा सत्पंथीयास शिवत नव्हते. अशा प्रकारची लाजीरवाणी परिस्थिती सत्पंथीयांना भोगावी लागली. शेवटी जात गंगेला शरण जावून त्यांचे दंड वसूल करून सत्पंथीयांना इ..स. १९३६ मध्ये जातीशी मिळवून घ्यावे लागले.

इ.स. १९२४ मध्ये आत्मानंदास शिक्षा झाली त्याच वर्षी मोठी यात्रा फैजपूरहून पीराण्यास गुरूदर्शनास जाण्यास रेल्वेने निघाली. जवळजवळ २५०/३०० लोक यात्रेस निघाले. तेथे त्यांच्यावर गुरूकृपा होऊन ईश्वरी अनुग्रहाने त्यांना तेथे अद्‌भूत रम्य गंगादर्शन झाले. पू. धर्मा महाराज हे सात्विकप्रवृत्तीचे सत्पुरूष होते. ते नियमित ईश्वराची पूजा नामस्मरण करीत. भगवंताच्या आत्यंतिक उपासनेने त्यांना सद्‌गुरू महाराजांचा स्वरूप साक्षात्कार झाला होता. मात्र त्यांना मित्र परिवार योग्य न मिळाल्याने व स्वतः पू. धर्मा महाराज शिकलेले नसल्याने त्याचा गैरफायदा लोकांनी उचलला. विशेषतः याच काळात सत्पंथ अनुयायांचे अध्वर्यु पद श्री तोताराम बधु महाजन यांना लाभलेले होते. म्हणून धार्मिक क्षेत्रात व इतर सर्व व्यवहारात सुध्दा

सर्व अनुयायी लोक त्यांना आपला पुढारी व नेता मानीत. मंदीराचा व्यवहार सुध्दा त्यांच्याच कडे होता. पूर्वापारपासून त्यांचा सावकारीचासुध्दा धंदा होता. त्यांच्या सावकारीत रोझोदा, बामणोद, राजोरा येथील काही जमिनी अगदी हलक्या किंमतीच्या पण त्यांच्या सावकारीत भरपूर किंमत वसूल करून (गहाण सोडवून) मंदीराकरीता विकत घेतल्या. फैजपूर येथील नथू किरंगे यांनी इ.स. १९२२ च्या सुमारास त्यांच्या मालकीची २ बिघे जमिन मंदीरास दान दिली.

दि. ९ फेब्रुवारी १९३९ रोजी पु. धर्मा महाराजांनी स्वर्गधामात प्रयाण केले. त्यांच्या वेळेस कंडारी येथील श्री कानजी बुवा हे एक कारभारी म्हणजे शेती वगैरेची देखरेख करणारे होते. त्यांना वैद्यक शास्त्राचा चांगला अभ्यास होता पण त्यांचा स्वभाव अत्यंत तिखट असल्यामुळे जास्त दिवस ते मंदीरात राहू शकले नाही. शेवटी कंडारी येथे जाऊन राहिले व तेथेच ते मरण पावले.

१०) आचार्य श्री पुरूषोत्तम महाराज :-
(इ.स. १९२० ते १९८२)

फैजपूर येथील सद्‌भक्त श्री खुशाल ओंकार भारंबे यांनी भावि आर्चक म्हणून त्यांची दोनही मुलें बालपणापासून बाल ब्रह्मचारी म्हणून अर्पण केले. त्यांच्यापैकी श्री पूंजो उर्फ यशवंत हे तरूणपणीच वारले व दुसरे पू. गुरू पुरूषोत्तम गुरू धर्मा महाराज हे आर्चक बनले. त्यांचा जन्म १९२० मध्ये झाला व इ.स. १९३६ च्या माघ शुध्द पौर्णिमेला त्यांना गादीवर घेऊन आर्चक पदाची वस्त्रे दिली. त्यांचे शालेय शिक्षण चालू असतांनाच गुरू धर्मा महाराजांचे अमळनेर येथील म्हसकर डॉक्टरांच्या दवाखान्यात ऑपरेशन करीत असताना निधन झाले. इ.स. १९३० पासून सावकाराच्या मनात डावपेच तयार झाले. त्यांनी हळूहळू मंदीराची संपत्ती व वेळोवेळी जमातीकडून जमा होत असलेले फंड वर्गण्या यांची रक्कम गिळंकृत करण्यास सुरूवात केली.

पू. गुरू पुरूषोत्तम महाराजांना १९३९ मध्येच शाळा सोडावी लागली. त्यांना अतिशय खडतर जिवन जगावे लागले. सामाजिक परिस्थीतीत ही अमुलाग्र बदल झाला. सामाजिक प्रतिकुलतेच्या काळात सोसाट्याच्या वाऱ्याने आजवर तेवत असलेली धर्मज्योत मालवते की काय अशी करूणाजनक स्थिती निर्माण झाली. पू. महाराजांनी अपार कष्ट सहून अतोनात काळजी वाहून, मनोधैर्य कायम राखून त्या मालवू पाहणाऱ्या धर्मज्योतिचे रक्षण केले. इ.स. १९३९ मध्ये पू. धर्मा महाराज दवाखान्यात असतांनाच सावकाराने कोऱ्या कागदावर सह्या करवून घेतल्या, निमित्त धर्माचे दाखविले व शेवटी

जमाखर्चात खोटे नाटे करारनामे वगैरे लिहून मंदिराची संपत्ति गडप करण्याचा प्रयत्न केला. कै. धर्मा महाराजांनी वीमा उतरविला होता तो सावकाराने महाराजांचा अंत होताबरोबर स्वतःच्या खात्यात बेचैन खत करून घेतले. शेवटी गुरू श्री पुरूषोत्तम महाराजांना दावा करावा लागला. त्यावेळेस एक नव्हे दोन नव्हे तर एकापाठोपाठ १२ दावे सावकाराने उभे केले. स. १९४६ मध्ये कुळकायदा आला. सर्व कुळांना हातशी धरून सावकाराने दावे उभे करणे भाग पाडले. महाराजांनी आपल्या समोर टिकाव धरू नये हा त्यातला उद्देश होता. पण महाराजांनी सुध्दा बुध्दीबळाने सावकाराशी तोंड देण्याचे ठरविले; व त्यात ते यशस्वी झाले.

गुरू पुरूषोत्तम महाराजांची अत्यंत हलाखीची परिस्थिती झाली. पूजाअर्चेचे उत्पन्न बंद पडले. कुळ कायद्यानुसार कुळ खंड देऊ लागले. एवढ्या कुळात फक्त फैजपूर येथील कै. रेवा गोमा भारंबे व त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटूंबीयांनी कुळकायदा न जागविता प्रामाणिकपणे उत्पन्न मंदीरास देत असत. बाकी सर्वांनी कुळ कायद्याचाच चंग बांधला. महाराजांनी कायद्याप्रमाणे झगडून ३२(ग) चे सर्टिफिकेट मिळविले. सर्वकुळांना सरकारी वर्गणीनुसार शेती विकत घ्यायची होती. पण ती त्यांना मिळू शकली नाही.

इ.स. १९४८ मध्ये गुरू धर्मा महाराजांचा विम्याचा दावा सावकाराच्या विरूद्ध जाऊन गुरू महाराज जिंकले म्हणून सावकाराने अधिक त्वेषाने त्रास देण्यास सुरूवात केली. इ.स. १९५२ मध्ये दावा गुरू महाराजांच्या बाजूने लागला. सावकाराच्या दुसऱ्या दाव्यात मात्र महाराज हरले. सावकाराने त्या रकमेची वसूली करण्याकरितां मंदीरास

कुलूप लावले. रक्कम वसूलीकरतां मंदीर भाड्याने देण्याचे त्याने ठरविले पण कोणीही भाड्याने घेण्यास तयार होईना. शेवटी स. १९७१मध्ये फुलाचे विरोदे येथील श्री दलपत यमाजी व श्री यमाजी शिवराम झोपे यांनी सावकाराची रक्कम भरून मंदीराचा दरबार खुला केला. इ.स. १९८२ च्या २७ जुलैस गुरू पुरूषोत्तम महाराजांना तिव्र स्वरूपाचा ह्दयविकाराचा झटका आला व त्यांचे व्यक्तिमत्व तिथेच स्थिर झाले.



११) विद्यमान गादिपती आचार्य श्री जगन्नाथ महाराज :
(इ.स. १९४२)

१) ४ जुलै १९४२ जयराम याचा जन्म राजोरा येथील श्री तुकाराम मंगु पाटील व सौ. चमेलाबाई यांच्या उदरी झाला. आषाढ शुद्ध पौर्णिमा या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेस जन्म झाला.

२) एप्रिल १९५४ मध्ये शाळा शिकण्याकरितां फैजपूर येथे सत्पंथी मंदीरात वडिलांनी आणले व त्याच वेळेस पुरूषोत्तम महाराजांच्या स्वाधीन केले.

३) मार्च १९५९ ला मॅट्रिकची परिक्षा म्हणजे ,११ वीची परिक्षा आटोपली व तेथेच शालेय शिक्षण आटोपले. शाळा शिकत असतांना बऱ्याच भजनांचा उतारा केला. जेथे माहीती पडले तेथून भजनांची वही आणून सत्पंथाच्या एकावेगळ्या भजनावलीचा उतारा केला. सत्पंथाच्या शास्त्रांचा जे अगदी जीर्ण झालेले होते त्यांचा नविन उतारा केला. कोर्टकामाच्या बऱ्याच नकलांचे उतारे करून देऊन महाराजांच्या कामात हातभार लावला. सन १९५६ मध्ये लहान भजनावली छापली. सन १९५७ मध्ये ''सद्गुरू इमामशाह महाराजांचा जीवनवृत्तांत '' संपूर्ण माहिती जमा करून मराठीत भाषांतरीत करून गुरू पुरूषोत्तम महाराजांच्या नावाने छापून प्रसिद्ध केला. •

४) २७ जुलै १९६२ गुरूपौर्णिमा आषाढ शु।। पौर्णिमा या दिवशी मंदीरात मोठा उत्सव होऊन पूर्वाश्रमीच्या जयरामला गुरू जगन्नाथ महाराज हे नांव ठेवून आचार्यपदाची दीक्षा दिली. तेव्हाच जगन्नाथ महाराजांनी ठरविले की पूर्वी पुरूषोत्तम बुवा, धर्माबोवा, बारसुबोवा हे

नाव काढून टाकून सर्वांना महाराज या आदरार्थी नावाने संबोधावे तसेच गुजराथमध्ये सुद्धा सवजीकाका, रामजीकाका, शंभुकाका, चंदुकाका, वगैरे काका हे नामाभिधान काढावे व महाराज याच पवित्र नावाने संबोधावे. मुख्य ठिकाणाचे नाव सुद्धा धर्मपीठ पीराणा, धर्मपीठ भाभाराम, धर्मपीठ रूण, धर्मपीठ कुकस व धर्मपीठ फैजपूर या नावानेच संबोधन करावे व सर्वत्र हा बद्दल हळू हळू घडत गेला.

५) डिसेंबर १९६२ मध्ये भुज-कच्छ मधिल 'नाना अंगिया' गावाला मंदिराच्या उद्‌घाटन समयी गुरू पुरूषोत्तम महाराजासमवेत जाणे झाले. ७/८ जण बरोबर होते.जगन्नाथ महाराजांनी रात्री हिंदीमधून प्रवचन केले. ५/६ मिनिटाठिकाणी ४५ मिनीट पर्यंत प्रवचन दिले ते सर्व लोकांना व विशेषतः भाणजीभाई,रामजीबापा, नथुबापा यांना खुप आवडले त्यांनी शाबासकी दिली पण पीराणायेथील सवजी काकांना खूपवाईट वाटले. जगन्नाथ महाराजांच्या स्वभावाला सुद्धा नविन कलाटणी मिळाली. सवजीकाका व महाराजांचा तेथूनच संघर्ष सुरू झाला. या प्रसंगाने मात्र महाराजांच्या मित्र मंडळीत एका सत्प्रेमी सुहृद मित्राची भर पडली ती व्यक्ति म्हणजे बडोदा येथील प्रायमरी शिक्षक श्री नाथुभाई जादव.

६) फाल्गुन वद्य प्रतिपदेस सन १९६४ मध्ये सुरतहून पीराण्यास पगपाळा संघ निघाला. त्याचे नेतृत्व जगन्नाथ महाराजांनीच केले. तो संघ पीराण्यास चैत्र शु ।। बीजेला पोहोचायला हवा होता पण २ दिवस आधिच पोहोचला. सवजी काका चिडले. महाराजांनी हार्डबोर्डवर सद्‌गुरू इमामशाह महाराज, श्री निष्कलंकी नारायण व दशावतार ही चित्रे फ्रेममध्ये मढवून संघात बरोबर घेतले होते. काकांनी महाराजांना

तबी दिली, सांगितले आपल्या धर्मात अशी चित्रे काढणे मना आहे. कयामतच्या दिवशी हेच चित्रे जिवंत होतील व सूया चाकूंनी टोचतील. महाराजांनी सांगितले तो कयामतचा दिवस आज जरी आला व ही चित्रे सुऱ्याचाकूंनी मला टोचू लागले तर मला दुःख न होता आनंद होईल कारण या चित्रामुळे धर्मनिष्ठलोकांत श्रद्धा भाव निर्माण होईल. त्याचवेळेस पालडीलाट कम्प्यात श्री दशावतार सप्ताहात ती चित्रे लावली. लोकांनी त्याची वाहवा केली. त्यावेळी पू. रामजीबापा, पू. नथूबापा, पू. भाणजीभाई या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन महाराजांना लाभले.

७) सन १९६४ ते ६७ च्या दरम्यान कच्छमध्ये कोटडा (उगमणा) कोटडा (आथमणा) चकार वगैरे भागात तसेच खिडोई, मानकुआ वगैरे ठिकाणी केव्हा मंदीराच्या उद्‌घाटन प्रसंगी, तर केव्हा दशावतार सप्ताह प्रसंगी जाणे झाले.

श्री जगन्नाथ महाराज व श्री नाथुभाई जादव यांनी सत्‌पंथ समाजात सुधारणा घडवून आणण्याचा खूप आग्रह धरला. तेथील लोक महाराजांना म्हणायचे 'बापू तुमचे प्रवचन असते चांगले उद्‌बोधनपर, पण आमच्या समाजातील बोथड लोकांना ते समजू शकत नाही. रूढी परंपरागत लोकांच्या अंगी जो गुण पडलेला आहे, तो सुधारणे फार कठिण आहे. खरेतर आमच्या नविन पीढीच्या लोकांना तुमचे मार्गदर्शनाची फार आवश्यकता आहे'. पण प्रौढापुढे त्यांचे काहीही चालत नव्हते.

८) सन १९६५ ते ७० या दरम्यान जगन्नाथ महाराजांनी मंदिरातील भिंतींवर अवतारांची चित्रे, दहाव्या अवतारातील प्रसंग चित्रे,

गीतातत्वज्ञान, वेद उपनिषदे, योगवाशिष्ठ वगैरे ग्रंथावर व इमामशाहांच्या जीवनावरील चित्रे काढली. काही हार्डबोर्डवर तर काही भिंतींवर अशी जवळजवळ १००/१२५ चित्रे काढली, सोबत बोधवचने, उद्‌बोधने, म्हणी, वगैरे लिहिल्या त्यामुळे मंदीराच्या सौंदर्यातही भर पडली, लोकांना उद्‌बोधनही झाले व जगन्नाथ महाराजांच्या मनातील स्वप्न साकार झाले.

९) सन १९६८ च्या मकरसंक्रांतीस भावनगर येथे ग्रंथाचा उतारा करण्याच्या उद्देश्याने जाणे झाले. महाराजांनी तिथे रोज रात्री पूजा आटोपल्यावर उद्‌बोधन केले. आठदिवसानंतर तिथे सवजीकाका आले त्यांनी महाराजांना मुनिवर चेतावणीचे कांही श्लोक म्हणायला लावून अर्थ सांगायला सांगितले. महाराजांनी अर्थ सांगितला तेव्हा काका मोठ्याने चिडून म्हणाले आम्ही गीतेला व गंगेला मानत नाही. आम्ही कुराणाला मानतो. महाराजांनी सांगितले कुराणही प्रेषीतने केलेले आहे व गीताही कृष्णाने केलेली आहे. शेवटी लोकांनी महाराजांना सांगितले तुम्ही यांच्या फंदात पडू नका व वाद वाढवू नका.

१०) सन १९६८ च्या सुमारास मंदिरातील नैऋत्य कोपऱ्यात असलेले पूजा अर्चेचे तक्त काढून मध्यभागी एक छोटेसे मंदीर बांधले तर चांगले होईल. असे सुचविताच गुरू महाराज तयार झाले. मंदीर बांधले गेले. आत अखंड ज्योतीची, ॐ ची, कलशाची स्थापना केली. १० मे ६९ मध्ये मोठा उत्सव होऊन नवीन मंदीराचे उद्‌घाटन झाले.

११) सन १९६७ च्या सुमारास श्रीमति बेबीताईची फारकत झाल्यापासून तिचे मंदिरात येणे जाणे वाढले स्वेच्छेने ती झाडलोट

सडा सारवण, ही कामे करू लागली. तिच्या अंगच्या गुणांनी, हुशारीने, भजन सत्संगात भाग घेऊन व सेवाकार्य करून थोड्याच दिवसात तीने सर्वांची मने जिंकली. जगन्नाथ महाराजांनी तिला गुरुभगिनी म्हणून मानले. ६९ पासून तिने स्वयंपाक, भांडी, दळणकांडण वगैरे सेवाकार्यात पूर्णपणे वाहून घेतले. मंदिरातील ही सर्व कामे करून ती शेतात जायची, उदर निर्वाहाकरितां शिवणकाम शिकली अशाप्रकारे दिवसेंदिवस मंदीरात तिचे सेवा कार्य वाढले. येणाऱ्यांची देखभाल करणे, मंदीरात येणाऱ्या महिलांना भजने शिकविणे, चिपळ्या टिपऱ्यांचे खेळ शिकविणे वगैरे कार्ये ती आजतागायत पर्यंत सुद्धा करीत आहे.

१२) सन १९५० मध्ये पहिल्याच श्रावण सोमवारी दुपारी २ वाजता सावकाराने मंदिराच्या दरवाज्यास कुलूप लावले. मंदिराच्या सर्वच कामात शिथीलता आली. गुरू महाराजांचा उत्साह भंग झाला. मंदिराच्या शेतीकरितां कोर्ट कामात कुळकायद्याच्या वाऱ्या सुरू झाल्या. जळगांव, यावल, रावेर कोर्टाच्या तारखांवर महाराजांना सतत वारंवार जावे लागे. गुरू महाराजांच्या ऐन तारूण्याच्या वेळेस कोर्टकामामुळे कोणतेच काम करण्यास उत्साह राहिला नाही. तरीपण महाराजांची ज्ञानलालसा व स्मरणशक्ति अजब होती. सामाजिक कारणामुळे बाहेरगांवच्या पूजा अर्चाही बंद पडल्या चोरून लपून पूजा अर्चा उटासने होत असत त्यामुळे उत्पन्नाच्या बाबतीत व ज्ञानाच्या बाबतीत पाहिजे तशी प्रगति होत नव्हती. दि. १/३/७१ रोजी फुलाचे विरोदे येथील श्री यमाजी शिवराम झोपे व त्यांचा मोठा मुलगा श्री दलपत मंदिरात आले. त्यांनी सांगितले, 'महाराज मी माझ्या मालकीची ७ बीघे जमिन विकली आहे. आपल्या मंदीराला कुलुप

असणे मला आवडत नाही. सावकाराचे जेवढे पैसे असतील तेवढे देऊन टाका. धर्माच्या नावांने मला हे दान द्यायचे आहे भगवंत मला याची भरपाई करीलच.' त्याच दिवशी सावकाराकडे जाऊन हिशेब केला व श्री यमाजी झोपेंनी ते पैसे भरून मंदिराच्या दरवाज्याचे कुलूप उघडले. सर्वत्र आनंदी आनंद झाला. तो क्षण सत्पंथाच्या इतिहासात सोनेरी अक्षराने लिहीला गेला. तेव्हापासून मंदीराची व सर्वच गोष्टींची भरभराट होत गेली.

१३) सन १९७२ च्या सुमारास गुढीपाडव्यानंतर श्री जगन्नाथ महाराज, श्री नाथुभाई बरोबर साबरकाठा जिल्ह्यात जगमेर कंपा, माताजीकंपा वगैरे कंप्यातील मंदीराच्या उद्घाटनाकरिता गेले. तेथे धनसुरा येथून प्रसिद्ध होणारे मासिक 'जागृति' यात सत्पंथाबद्दल खोडसाळ पणाचा लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखाबद्दल खुलासा करण्याकरिता महाराज व नाथुभाई धनसुरा येथे गेले त्यांनी तेथील प्रमुखांना सत्पंथाबद्दल माहिती दिली व त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. त्यांनी सांगितले हे आम्ही आमच्या कडवा पटेल लोकांकरितां लिहीले होते. त्यांना महाराजांनी संपूर्ण सत्पंथाची मान्यता, पूजा अर्चा, पाऊळगोळी, दफनविधी, वगैरे बद्दल माहिती दिली. शेवटी त्यांनी माफी मागितली व पुढच्या अंकात माफी पत्र प्रसिद्ध केले.

१४) सन १९७५ मध्ये आक्टोबर महिन्यात खंबायतहून भाभाराम रूणला पगपाळा संघ महाराजांच्या नेतृत्वाखाली काढला. तो उत्तम प्रकारे पार पडला. त्याच वेळेस पलोल येथे श्रीराम मंदीरात भाभाराम महाराजांचे दर्शन महाराजांना घडले. एका ब्राह्मणाच्या रूपाने येऊन त्यांनी महाराजांना आशीर्वाद दिला की तुझे जीवन धर्म सेवेकरिताच

आहे. त्यायोगेच धर्मप्रचार होईल.

१५) सन१९७५ नानाअंगिया येथे व ७६ साली कोटडा चकार येथे श्रीमद्दशावतार सप्ताह निमित्त जाणे झाले. त्या दोनही ठिकाणी महाराजांनी अध्यात्म वाणीचाच उपदेश केल्याने लोक विशेष आकर्षिले गेले. कोटडाहून परत येत असतांना श्री नाथुभाई यांचेकडे महाराज आले. त्यांच्या घरी मुळबंध ग्रंथ पाहिला व त्याचा उतारा करण्याची इच्छा महाराजांनी व्यक्त करताच त्यांनी तो ग्रंथ दिला. २ वर्षेपर्यंत त्याचा उतारा गुजराथीतून चालला.

१६) स. १९७७ च्या सुमारास श्री नाथुभाईंचे वडिल वारले. त्यांचा अस्थिकलश घेऊन महाराजासोबत सर्वलोक हरिद्वार, ऋषिकेश, बद्रिनाथ, केदारनाथला गेलो. त्या प्रवासाचे वर्णन महाराजांनी आत्मचरित्रात लिहिलेले आहे.

१७) सन ७८ मध्ये खेडोई कच्छ येथील मंदिराचे उद्घाटनानिमीत्त जाणे झाले. ७९ मध्ये करसनपुरा कम्पा येथील मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी, तर ८० मध्ये कच्छ मधिल कादिया आश्रमात पू. संत रामजीबापूंच्या ज्ञानयज्ञाकरिता जाणे झाले. सर्वांनी महाराजांची प्रशंसा केली. अध्यात्म ज्ञानाचा दिव्योपदेश केल्याने सर्वांना आनंद झाला.

१८) सन १९८० आवाखल येथे ऐतिहासिक स्वरूपाचा दशावतार सप्ताह झाला. त्याचे अध्वर्युपद जगन्नाथ महाराजांना लाभले होते. सवजीकाका, रामजीबापू या वरिष्ठ लोकांनी सप्ताहास येण्याचे नाकारले म्हणून आचार्यपद जगन्नाथ महाराजांना मिळाले होते. संपूर्ण कानम जिल्ह्यात बारगामवाले मोमीन पाटलांच्या जून्या रूढ्याबदलवून त्यांना नविन वळण लावावे या उद्देशाने त्यांनी सप्ताह आयोजीत केला होता.

भगवंताच्या कृपेने महाराज त्या कामात यशस्वी ठरले. पू. सवजीकाकांचा अजिंक्य गढ महाराजांनी जिंकला म्हणून पू. रामजीबापूंनी खूपच प्रशंसा केली.

१९) सन ८१ मध्ये देसाईपुरा मंदिराचे उद्घाटन व श्रीदशावतार सप्ताहाचे वाचन. ८२ मध्ये गाडूकम्पा येथील मंदिराचे उद्घाटन करिता जाणे झाले.

२०) सन१९८२ जुलैच्या २७ तारखेस गुरू पुरूषोत्तम महाराजांचे महानिर्वाण झाले. त्यांच्या प्रयाणानंतर सहाच महिन्याने फैजपूर, रोझोदा व बामणोद येथील कुळकायद्यात अडकलेल्या शेतजमिनी मंदिराच्या ताब्यात मिळाल्या.

२१) सन ८२ ते ८३ च्या दरम्यान मंदिराच्या मुख्य दोनही हॉलवरील कौले काढून पत्रे टाकली व तिसऱ्या मजल्याची उंची वाढविली. मंदिराच्या मळ्यात गुरू पुरूषोत्तम महाराज, गुरू धर्मा महाराज, गुरू बारसु महाराज यांच्या समाध्या बांधल्या. ८३ सालच्या २७ जुलैस कानळदा येथील कण्वाश्रमातील आचार्य श्री चंन्द्रकिरण सरस्वती महाराजांच्या हस्ते विष्णुयाग होऊन गुरूमहाराजांच्या पादुकांची मळ्यात समाधीस्थानात स्थापना झाली.

२२) सन ८४ मध्ये मंदिराच्या मुख्य हॉलवरील दोनही स्लॅब टाकले. व मंदिरासमोरील जागा विकत घेतल्या. सन ८४ मध्येच संपूर्ण गुजराथ यात्रा प्रवास लक्झरी बसने केला. सन ८५ मध्ये उत्तरप्रदेश, हरिद्वार, ऋषिकेष, बद्रीनाथ, केदारनाथ, पशुपतिनाथ, गंगासागर यात्रा प्रवास केला. स. ८६ मध्ये लक्झरी बसने गंगोत्री, यमुनोत्री, बद्रीनाथ, केदारनाथ वगैरे चारधाम यात्रा प्रवास झाला.

२३) सन १९८६ मध्ये गुरू करसनकाका गादीवर निवडले गेले. त्यांचा स्वागत सत्कार फैजपूर येथे केला. २५ डिसेंबर ८६ मध्ये राजोरा येथील मंदिराचे उद्घाटन झाले त्यावेळेस पीराणा येथे अक्षरधाम बांधण्याचे काम चालू झाले. त्याकरिता गावोगाव फिरून महाराजांनी १ लाख रूपये जमा केले व पीराण्यास ४ खोल्यांच्या बांधकामास मदत केली.

२४) सन ८७ मध्ये खंबायत येथे बालेशाहांच्या मंदिरात नविन धर्मशाळेच्या उद्घाटनाकरिता जगन्नाथ महाराजांना त्यांनी आमंत्रीत केले. करसनकाका तेथे प्रमुख पाहुणेच्या रूपाने उपस्थित राहिले. उद्घाटनाच्या वेळेस काकांनीच उद्घाटन केले. पूजेच्यावेळेस सुध्दा महाराजांनी आदरभावाने काकांना पूजा करा असे म्हटले, पूजा करण्यास सुध्दा काकाच तयार झाले. त्यांनी जुन्या पध्दतीनेच पूजा केली. सर्व लोक नाराज झाले. त्यावेळेस डुंमस येथील श्री मोहनभाई सुध्दा उपस्थित होते. त्यांनी भाषणात सांगितले की 'पू. करसन काकांनी नविन पध्दतीनेच पूजा करावी व पीराण्यास नविन साहित्याचीच उपलब्धता करून द्यावी.'

२५) सन ८८ मध्ये कच्छभुज आनंदसर येथे मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी जाणे झाले. ८९ मध्ये पू. करसनकाकांना 'सत्पंथ नवनीत' ग्रंथाचे विमोचन करण्याकरिता आमंत्रीत केले, त्यांनी नकार दिला ते म्हणाले, तुमच्याकडचे रस्ते बरोबर नाही, स्वागताची पध्दत बरोबर नाही. प्रकृतीही बरोबर नाही. आणखी एकट्या कामाकरिता येथे जाणे परवडत नाही ! शेवटी भाभारामच्या पू. शंभुकाकांना आणून सत्पंथ नवनीताचे विमोचन केले.

२६) सन ९० मध्ये संपूर्ण गुजराथ यात्रा प्रवास झाला. ममाईमोरा येथील मुखींनी महाराजांना पूजा करू दिली नाही. तो एक प्रकारचा अपमान त्यांनी सहन केला पण दुसऱ्यांदा यज्ञहोमाकरिता तेथेच जाणे झाले. तेही आमंत्रण महाराजांनी स्विकारले तेव्हा मुखी लोकांनी क्षमा मागितली व धर्मध्वजेची स्थापना महाराजांच्याच हातून केली.

२७) ८-३-१९९३ धानोरा येथील मंदिराच्या जीर्णोध्दार प्रसंगी पूजेच्या मंत्राचे जुन्या व नव्या रीतीरिवाजानुसार पूजा करण्याचा प्रश्न उद्‌भवला पू. करसनदास महाराजांनी नव्या पध्दतीने पूजा करण्याचे योजताच जगन्नाथ महाराजांनी काकांना धर्मपीठ पीराण्याहून नविन पध्दतीनेच पूजा करण्याचा आदेश काढणे भाग पाडले. काकांच्या आदेशानुसार सर्वत्र नव्या पध्दतीने पूजा करण्याचा आग्रह लोकांनी धरला व नविन पूजा पध्दती सुरू झाली.

२८) दि. ४ ते ६ मे १९९२ रोजी पीराण्यास दहावे अखिल भारतीय संत संमेलन करण्याचे निश्चीत झाले. त्या प्रसंगी पीराण्यास देण्याकरिता गुजराथी लीपी व भाषेमधून ४'x८' साईझचे बोर्ड रात्रंदिवस मेहनत घेऊन रंगविले. भाड्याने मेटॅडोर केली व पीराण्यास नेले. पू. करसनकाकाला श्री शामजीदादाला, श्री जीवराजभाईना सांगितले की हे सर्व सत्पंथाचे बोर्ड संत संमेलना ठिकाणी लावण्याकरिता आणले आहे. महाराजांची दाद कोणीच घेतली नाही. जे टेन्ट, साहित्य विक्रीकरिता ठेवले होते तिथे तर जागा मिळालीच नाही. महाराजांबरोबर जी मुलं गेली होती त्यांनी मेहनत करून बाजूस एका कोपऱ्यात जागा मिळवली. तिथही ते लोक लावू द्यायला तयार नव्हते, पण महाराजांनी श्री शामजीदादा व श्री जीवराजभाईंची विनंती करून ते बोर्ड लावले

तेही शेवटच्या दिवशी. संमेलन आटोपले. महाराज खुप नाराज झाले. त्यांनी ते बोर्ड तेथेच एका रिकाम्या खोलीत ठेवले. एकदा श्री करसनदास काकांचे मित्र श्री अविचलदास महाराज व श्री रामदास महाराज यांनी ते बोर्ड पाहिले, वाचले व ते म्हणाले हे बोर्ड कोणी तयार केले तेव्हा सांगितले जगन्नाथ महाराजांनी. त्यांनी म्हटले संत संमेलनात हे बोर्ड लावायला पाहिजे होते. कां लावले नाही? काकांनी सांगितले, ते बोर्ड कोणी वाचणार नाही म्हणून लावले नाही. शेवटी त्या दोघं महाराजांनी सांगितले, तुमच्या संपूर्ण संप्रदायात हीच एक व्यक्ति आहे संपूर्ण ज्ञान धारण करणारी. तुम्हाला त्यांनी काय लिहीले आहे हे तरी समजले काय? वास्तविक हे तुमच्या पूजा घरात लावायला पाहिजे तेव्हा त्यातले काही बोर्ड पूजा घरात लावले गेले.

२९) सन ९३ मध्ये मानकुवा येथे बालक बालिका शिबीर झाले. तेथे २०/२२ पत्रकारांच्या समोर जगन्नाथ महाराजांची मुलाखत घेतली. त्यांनी सर्व उत्तरे बरोबर दिली म्हणून लोकांना खूपच आनंद झाला.

३०) स. ९३ मध्ये श्रीमद्दशावतार ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. पू. करसनदास महाराजांच्या हस्ते त्याचे प्रकाशन केले. त्याच वेळेस संतकृपा आश्रमाचे भूमिपूजन केले. त्या ग्रंथात वर गुजराथी भाषा व लिपीत इमामशाह महाराजांच्या ओव्या व खाली मराठी भावार्थ असे प्रींट होते. पण तो पीराण्याहून प्रसिद्ध झालेला नव्हता म्हणून कच्छ कडवा पटेल लोकांनी घेतला नाही. स. १९९७ मध्ये त्याच ग्रंथाची दुसरी आवृत्ति मराठी भाषेत छापून प्रसिध्द केली.

३१) सन ९४ मध्ये घाटकोपर येथे तेरावे संत संमेलन झाले तेथे यज्ञयाग होमहवनाची पूजा महाराजांच्या हस्ते झाली. त्या संमेलनात

सुरूवातीस महाराजांचे प्रवचन १० मिनिट पर्यंत झाले त्यात त्यांनी संपूर्ण सत्पंथाची मान्यता व तत्त्वज्ञानाचा उपदेश केला.

३२) स. १९९५ दहेगाम जवळील एका कम्प्यात मंदीराच्या उद्घाटन प्रसंगी महाराज्यांच्या हस्ते होम हवन यज्ञाची पूजा केली.

३३) सन ९५ ते ९७ फैजपूर येथे संतकृपा आश्रमाच्या इमारतीचे बांधकाम झाले. खाली तळघर. त्यावर सत्संग हॉल वरच्या मजल्यावर ३ खोल्या. वर ४० फूट उंच टॉवर. खंबायतहून घड्याळ आणले. सत्संग हॉलमध्ये सिंहासन बनवून सदगुरू श्री इमामशाहांची मूर्ति बसवावी असे ठरले. श्री जगन्नाथ महाराज श्री नाथुभाई, श्री मोहनभाई पीराण्यास गेले. काकांची परवानगी घेतली. त्यांनी होकार देताच जयपूरहून मूर्तिची ऑर्डर दिली. मूर्तिच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळेस व वास्तूशांतिच्या वेळेस मात्र पीराण्याहून, कच्छ व उत्तर गुजराथमधून कोणीही आले नाही. दक्षिण गुजराथ, सुरत, डुंमस, महाराष्ट्र, मध्यप्रदेशातून लोक आले. कुकस येथील आचार्य सवगुणदासजी महाराजांच्या हस्ते मूर्ति प्रतिष्ठापना केली. त्याचवेळेस एक पक्षाच्या रूपाने येऊन गुरूमहाराजांनी संमति दर्शविली. धर्म शाळेची जागा नुकतीच ताब्यात आल्याने त्याचे भूमिपूजन पू. सवगुणदास महाराजांचे हातून करवून घेतले.

३४) १७-३-९७ रोजी अतिशय थकवा आल्याने जगन्नाथ महाराजांना औरंगाबाद येथे बजाज हॉस्पीटल मध्ये अॅडमीट केले. २७ जुलै ९७ हृदयविकाराचा दुसरा तिव्र झटका आला. २० ऑगस्ट ९७ मध्ये मुंबईला हरकिसनदास हॉस्पीटल मध्ये बायपास सर्जरीचे ऑपरेशन झाले. ऑपरेशनच्या बाबतीत श्री प्रशांत झोपे, हेमंत झोपे, राजोरेकर

बंधु, श्री मोहनभाई, डुंमस येथील अनुयायीवर्ग, सुरत येथील प्रेमीभाई, श्री पुंडलीक महाजन, श्री उत्तमराव महाजन वगैरे लोकांनी आर्थिक सहाय्य केले तर श्रीमती बेबीताई, अन्नपूर्णाबाई, श्री अरविंद धोंडू झोपे यांनी अतिशय मेहनत व काळजी घेऊन सेवाचाकरी केली. त्याचे योग्य फळ मिळाले.

३५) श्री जगन्नाथ महाराजांची प्रकृती ठिक नसल्याने पुढील वारस म्हणून पिंपळगांव गोलाईत येथील दोन मुलांना दिक्षादानाचा विधी करून घ्यावा असे सर्वानुमते ठरल्याने तो समारंभ २२ डिसेंबर १९९७ या दिवशी मोठा समारंभ करण्याचे ठरले. त्यात श्री रामदास याचे नामाभिधान जनार्दन व श्री प्रमोद याचे नामाभिधान पूर्णानंद ठेवले. वयाच्या ११ व्या वर्षी ते दोघे फैजपूरला आले होते. दोघांचे बारावी पर्यंत शिक्षण मंदिरातच झाले.

३६) सन ९७ व सन ९८ मध्ये संस्कारमाला भाग १ व २ प्रसिध्द केले. त्याचा परिणाम मुलामुलींवर व पालक वर्गावर चांगलाच झाला. बालकांना वळण लावण्यात महाराज यशस्वी झाले.

३७) सन १९९९ मध्ये संत समागम ग्रंथ श्री जगन्नाथ महाराजांनी प्रसिध्द केला. पूर्वी सदगुरू इमामशाह महाराज जीवनवृत्तांताची आवृत्तीही संपलेली होती त्यामुळे हा मोठा ग्रंथ प्रकाशित केला.

३८) सन २८ जुलै ९९ मध्ये प्रा. श.रा.राणे सरांनी लिहिलेले गुरू जगन्नाथ महाराजांचे चरित्र 'रथ जगन्नाथाचा' हे ऐतिहासिक पुस्तक प्रसिध्द केले. तेव्हा श्री जगन्नाथ महाराजांच्या जीवनावर प्रकाश पडून त्यांचे जीवन लोकांना अधिक समजले.

३९) सन १९९९ च्या सुमारास श्री सत्पंथी मंदीरातून त्रैमासिक

काढावे असे ठरल्यावरून मराठी त्रैमासिक सत्पंथ प्रेरणा सुरू केले आहे.

४०) गुरू जगन्नाथ महाराजांच्या मनात सत्पंथ साहित्याबद्दल अतोनात प्रेम आहे ते संपूर्ण साहित्य प्रिंट व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा आहे त्याच बरोबर धर्मशाळेचे सुध्दा बांधकाम करावे ही त्यांची आंतरीक इच्छा आहे. आशेचा किरण उगवतो आहे. भगवंत त्यांच्या संपूर्ण इच्छेस यश देवो ही श्री सद्‌गुरू इमामशाहचरणी प्रार्थना!

जय निष्कलंकी नारायण!! जय सत्पंथ!!!

(परिशिष्ट)


पीराणा संस्थेतील काका महाराजांच्या परंपरेचा इतिहास

प.पू. सद्गुरू इमामशाह महाराजांनी पीराणा येथे स्वतंत्र गादीची स्थापना केली व त्या गादीवर बालब्रह्मचारी हिंदू गादीदार यांची शिष्य परंपरेने नेमणूक केली. त्यांनी त्यांच्याच हयातीत इ.स. १४९० मध्ये धर्मपीठावर संत श्री शाणाकाकाना गादीचा वारस नेमले व संस्थानाची संपूर्ण वहिवाट त्यांच्या ताब्यात दिली. त्यांच्यानंतर कित्येक वेळेस निवड होऊन, कित्येक वेळेस बेडी घालून, आचार्यांची नेमणूक झाली. साधारणतः रामजीकाका पर्यंतचे काका हे बालब्रह्मचारी होते. पण नंतर सवजीकाका व करसन काका हे संसारातून निवृत्त झालेले आचार्य म्हणून निवडले गेले. तेथील गादीपरंपरा अशा प्रकारची आहे. विद्यमान आचार्य मयत झाल्यानंतर लगेच दुसऱ्याची निवड करून त्यांच्याकडून मृत आचार्यांचा मरणविधी केला जातो.

अ.न.	गादीवर बसण्याचा सन	नांव	निवर्तल्याचा सन
१	१४९०	शाणा काका	१५३५
२	१५३५	सामजी काका	१५६४
३	१५६४	कृष्णा काका	१५९५
४	१५९५	सोमजी काका	१६३५
५	१६३५	रैया काका	१६८०
६	१६८०	रामजी काका	१७२०

अ.न.	गादीवर बसण्याचा सन	नांव	निवर्तल्याचा सन
७	१७२०	नथु काका	१७३४
८	१७३४	भुला काका	१७६०
९	१७६०	प्रगजी काका	१७८५
१०	१७८५	नथु काका	१८०६
११	१८०६	दीपा काका	१८२९
१२	१८२९	मनजी काका	१८३५
१३	१८३५	नथु काका	१८५२
१४	१८५२	नागजी काका	१८६०
१५	१८६०	सामजी काका	१८६७
१६	१८६७	पेथा काका	१८८०
१७	१८८०	नथु काका	१९००
१८	१९००	करमसी काका	१९२०
१९	१९२०	लक्ष्मण काका	१९३८
२०	१९३८	रामजी काका	१९६२
२१	१९६२	सवजी काका	१९८६
२२	१९८६	करसन काका	---

आता पीराण्यास धर्मपीठावर गुरू आचार्य करसनदासजी महाराज हे विराजमान आहेत व त्यांची वहिवाट चालू आहे.



श्री सतपंथी मंदीर संस्थान, फैजपूर, सन १९८३



श्री सतपंथी मंदीर संस्थान, फैजपूर, सन २०००



श्री संतकृपा आश्रमातील

प.पू. सद्गुरू श्री इमामशाह महाराजांची मूर्ति

(संपूर्ण भारतात महाराजांची ही पहिलीच मूर्ति आहे.)



श्री संतकृपा आश्रमाचे टॉवर